विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१७ |
| वर्ष | : | बावनवे |
| अंक | : | तिसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

## गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या

## “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती

## गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१७

## गणपत्रिका क्रमांक : १९३

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

# सद्धर्म

## त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

संस्थापक
**गुंडोपंत हरिभक्त**

**वार्षिक ऐच्छिक देणगी**
**किमान ७५ रुपये**

**दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.**
**भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $**

वर्ष : बावन्नावे अंक : तिसरा आश्विन / कार्तिक शके १९३९, ऑक्टोबर २०१७

## *संपादकीय*

### भोंदूबाबा आणि आपले अध्यात्म

२५ ऑगस्ट २०१७ ला पंचकूल हरियाणा येथील CBI च्या न्यायालयाने डेरा सच्चा सौदाचे प्रमुख श्री. गुरमीत राम रहिम सिंग यांना आपल्या आश्रमातील दोन साध्वींशी अतिप्रसंग केल्याचे आरोप सिद्ध झाल्यावर, २० वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा आणि ३० लाख रु. चा दंड ठोठावण्यात आला.

२००२ ला तत्कालीन पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांना रामरहिम सिंग यांच्या या दुष्कृत्याची माहिती देणारे निनावी पत्र पाठवण्यात आले होते. तत्कालीन गृहमंत्री, CBI चे Director आणि पंजाब उच्च न्यायालयालाही या पत्राच्या प्रती पाठवण्यांत आल्या होत्या. याच आधारावर पंजाब न्यायालयानी कारवाई चालू केली, आणि १५ वर्षानंतर म्हणजे २०१७ ला त्याचा निकाल लागला.

२५ ऑगस्टला या बाबांना शिक्षा ठोठावल्यावर पंचकुलामध्ये जमा झालेल्या बाबांच्या काही लाख अनुयायांनी दंगा आणि जाळपोळ केली. त्यामध्ये ३० पेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाला, आणि कित्येक जखमी झाले. या सगळ्या घटनांचे धावते वर्णन दूरचित्रवाणीच्या माध्यमांमधून लोकांपर्यंत सतत पोहोचत होते. अध्यात्माचा संदेश देणाऱ्या या बाबांच्या जीवनशैलीच्या सुरस, आणि धक्कादायक नवीन कथा, अक्षरशः दर क्षणाला ही माध्यमं देत होती.

सर्वसामान्य नागरिकाला या देशामध्ये व्यापार, उद्योग करण्याकरता अनेक सरकारी नियमांना सामोरे जावे लागते. त्यातच त्याला चांगला फायदा झाला तर, आयकरापासून अनेक कायद्यांना त्याला तोंड द्यावे लागते. हे सगळे करतांना त्याचा जीव मेटाकुटीस आलेला असतो. पण या अध्यात्मिक गुरुंनी केलेली माया, आणि त्यांचा ‘मायाबाजार’ बघून मति गुंगच नाही तर बधीर होऊन जाते.

(पृष्ठ क्र. २७ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षांकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षांकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**५) दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ.(आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् । वाराणस्यां तु विश्वेशम्। | ५ |
| गीतकृष्णायन–भाग ४– योगेश्वर | ६ |
| श्री साईबाबांचा अमृतप्रसाद ''उदी'' | ९ |
| भगवान श्री दत्तात्रेय | १३ |
| महाभारताचा महिमा श्रीज्ञानेश्वरांच्या शब्दांत | १९ |
| कौटिल्यीय अर्थशास्त्र | २५ |


आपणांस कांही लेख पाठवायाचे असल्यास तेही पाठवावेत. संपादकांच्या अनुमतीने योग्य असल्यास, आवश्यकता वाटल्यास योग्य ते संपादकीय संस्कार करून छापले जातील. सर्व देणगीदारांस नम्र विनंती – बँकेत परस्पर जमा रकमेचा ते पैसे कोणी भरले आहेत याचा तपशील दिला जात नसल्याने देणगीदाराच्या नांवावर पैसे जमा करता येत नाहीत, पण न्यासाच्या हिशोबात योग्य प्रकारे नोंद घेतली जाते.

## सद्धर्माची प्रकाशने

(पोस्टेज सह)

| | | |
|---|---|---|
| १) | सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) | श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) | हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) | श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) | कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) | तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) | पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) | कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) | सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) | उपासना | रु. ४० |
| ११) | श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) | चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) | गंगालहरी | रु. २५ |
| १४) | गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) | सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) | श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |

## एप्रिल ते सप्टेंबर २०१७
## दीर्घकालीन सभासद (दी. का.) आणि ऐच्छिक / विशेष देणगी

श्री. बाबरेकर वसंतराव सुमंत, गिरगांव, मुंबई – २०००/–

वैद्य श्री. साठे नारायण चिंतामणी, बोरीवली मुंबई – १०००/–

श्री. साठे नारायण सुरेशचंद्र, पुणे –१०००/–

श्री. थिटे द. प्रभाकर, डोंबिवली – १०००/–

श्री. कवठेकर रा. मकरंद, अहमदाबाद – १०००/–

श्री. ओजळे मधुकर महेश, ठाणे – १०००/–

**– संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ३२ वा

**प्रत्यासन्नविपत्तिमूढमनसां प्रायो मतिः क्षायते।**[३७६]

येणाऱ्या संकटामुळे माणसाची बुद्धी विचलित होते.

संपूर्ण सुभाषित :

**पौलत्स्यः कथमन्यदारहरणे**
**दोषं न विज्ञातवान्**
**रामेणापि कथं न हेमहरिणस्य**
**असंभवो लक्षितः।**
**अक्षैश्चापि युधिष्ठिरेण सहसा**
**प्राप्रो ह्यनर्थः कथं**
**प्रत्यासन्नविपत्ति... ।।**

दुसऱ्याची बायको पळवून नेणे हे दोषास्पद आहे हे रावणाला माहीत नव्हते काय? सोन्याचा हरीण असंभवनीय आहे हे रामाच्या लक्षात आले नसेल काय? द्युत खेळण्यामुळे अनर्थ ओढावेल हे युधिष्ठिराला कळले नव्हते काय? पण अखेर ' बुडत्याचा पाय खोलात' हेच खरे.

**साम्नैव यत्र सिद्धिर्न तत्र दण्डो बुधेन**[३७७] **विनियोज्यः।**

दुसरी ओळ :

**पित्रं यदि शर्करयाशम्यति**
**कोऽर्थः पटोलेन।।**

सामोपचाराने जेथे समस्यावर तोडगा निघू शकतो तेथे शहाण्याने दंड नीतीचा उपयोग करू नये. पित्त जर साखरेने कमी होत असेल तर पडवळाचा रस घ्यायची काय गरज?

**सेवाधर्मः परमगहनो योगिनामपि अगम्यः**[३७८]

परवशता पाश दैवे ज्यांच्या गळा लागला.

संपूर्ण सुभाषित :

**मौनान्मूकः प्रवचनपटुर**
**वातुलो जल्पकोवा**
**क्षान्त्या भीरुर्यदि न सहते**
**प्रायशो नाभिजातः।**
**द्युष्टः पार्श्ववसति नियतं**
**दूरतश्चाप्रगल्भः**
**सेवाधर्मो परमगहनः...।।**

मालकाचे समाधान होईल अशा रीतीने नोकरी करणं फार कठीण आहे हे योगी माणसाच्या पण बुद्धीच्या पलीकडचे आहे. नोकर गप्प राहिला तर मालक म्हणतो मुका आहे. बोलू लागला तर मालक म्हणतो वाचाळ, बडबड्या आहे. शांत राहिला तर मालक म्हणतो भेकड आहे. सहन झाले नाही तर मालक म्हणतो हा अजाण आहे. पुढे आला तर मालक म्हणतो आघाव आहे आणि मागे राहिला तर मालक म्हणतो अहो ह्याला जरा हे (डोक्याकडे बोट करून) कमीच आहे.

(पृष्ठ १२ वर)

# ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् । वाराणस्यां तु विश्वेशम्।

दि. दा. औटी

लेख १० वा

गौतमी म्हणजे गोदावरी नदी. तिच्या काठावर म्हणजे त्र्यंबकेश्वर येथे.

**सह्याद्रीशीर्षे विमले वसन्तं**
**गोदावरी तीरपवित्रदेशे।**
**यद्दृर्शनात्पातकमाशु नाशं**
**प्रयाति तं त्र्यंबकमीशमीडे।**

अन्वयः - गोदावरी तीरपवित्रदेशे विमले सह्याद्रीशीर्षे वसन्तं त्र्यम्बकम् ईशम् (अहं) ईडे, यत्दर्शनात् पातकम् आशु नाशं प्रद्याति।

भाषांतर :- गोदावरीच्या काठी पवित्र परिसरात स्वच्छ सह्याद्रीच्या शिखरावर राहणाऱ्या त्र्यम्बकेश्वराचे मी स्तवन करतो. ज्याच्या केवळ दर्शनाने पातकांचा चटकन नाश होतो.

शब्दार्थ - वसन्तम्-वस् १ पप. कर्तरि वर्तमान कालवाचक धा. सा. वि. प्र. पु. ए. व. राहणारा त्र्यम्बकम्-अम्बक-डोळा. त्रीणि अम्बकानि यस्य सः त्र्यम्बकः बहु. तम्। ईडे - ईड् २ आ.प. लट् लकार उत्तम पुरुष ए.व. (मी) स्तवन करतो, आशु-चटकन. आशु तुष्यति इति आशुतोषः उपपद तत्पु. शंकर.

वृत्त- इन्द्रवज्रा (गण त त ज ग ग) ह्या वृत्ताविषयी माहिती गेल्याच लेखात दिली आहे.

त्र्यंबकेश्वर हे दहावे ज्योतिर्लिंग नाशिकपासून जवळच त्र्यंबकेश्वर या ठिकाणी आहे. या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांची तीन लिंगे आहेत. म्हणूनच ह्याचे नाव त्र्यंबकेश्वर असे आहे. यापैकी महेशाचे जे लिंग त्यावर सतत पाणी झिरपत असते हा एक प्रकारे शंकरावर संतत धारेचा अभिषेकच आहे. जवळच कुशावर्त नावाचे महातीर्थ आहे. सिंहस्थपर्वणीत दर १२ वर्षांनी जेव्हा गुरु सिंह राशीत असतो तेव्हा येथे कुंभमेळा भरतो. लोक कुशावर्तात स्नान करून पवित्र होण्यासाठी संबंध भारतातून येतात.

कुशावर्ताजवळ एक मोठा गंगासागर नावाचा तलाव असून तेथे निवृत्तीनाथांची समाधी आहे. ब्रह्मागिरी परिसरात रामतीर्थ, प्रयागतीर्थ, नृसिंहतीर्थ अशी अनेक रम्यस्थाने आहेत. हे थंड हवेचे ठिकाणही आहे.

**महामृत्युंजय मन्त्र**

**ॐ त्र्यंबकं यजामहे**
**सुगन्धि पुष्टिवर्धनम्।**
**उर्वारुकमिव बन्धनान**
**मृत्योर्मुक्षीय मांडमृतात्।**

इति शिवम्। क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

## 'पतिव्रता व्रत' – जाती सृष्टिलता

द्वैतवनातिल रम्य तडागी गूजपुष्प उमलते
पतिव्रतेचा धर्म द्रौपदी भामेला सांगते ।।धृ ।।

त्यागुन क्रोधा सदा करतसे अती मधुर भाषण
सर्वांनी केल्याविण अन्नहि ना करते भक्षण
संसारी या सावध वर्तन करते सारे क्षण
अहंकार रिपु घोर तयाला सदा दूर ठेवते ।।१।।

पतिदेवांची अविरत सेवा एक मनी कामना
गृहसौख्याचा अमोल ठेवा जपणे ही अर्चना
ना ठावी मजला कुठलीही दुसरी आराधना
वडीलधाऱ्यांच्या शब्दाला आनंदे पाळते ।।२।।

रणभूमीला जात पती जव करावया रक्षण
चिंतोनी शुभ निरोप देणे पतिव्रता लक्षण
कुळाचार अन कुळधर्माला पाळ असे शिक्षण
विजयी ते परतोनी येता प्राणे ओवाळते ।।३।।

घरातील साऱ्या वस्तूंची सदा राखते निगा
ना दवडी क्षण एकहि माझा सत्कार्याविण उगा
प्रयास करते करण्या मी या अधिक सुंदर जगा
कृपणावाणी आनंदाचा कण आणि कण जपते
।। ४ ।।

ना ठावे मज काही चेटुक ना विदया कोणती
ना मज येती मंत्रतंत्रही करण्याला वश पती
ठेवत तेवत आचरणाची निर्मल जरी पणती
पती न केवळ ही पांचाली त्रैलोक्या जिंकते
।।५।।

बलरामाचं सासर असलेल्या आनर्त देशात एक कुचैल नावाचं गाव होतं. रामकृष्णांचा गुरुबंधू सुदामा त्या गावात आपल्या बायकोमुलांसह रहायचा. परिस्थितीनं तो अगदी दरिद्री होता. पौरोहित्य करून कसेबसे दिवस रेटत होता. जिथे हातातोंडाची गाठ पडणं दुष्कर तिथे बिचारा सुदामा आपल्या कुटुंबियांचे कोड काय आणि कसे पुरवणार?

मात्र कृष्णाचा विषय निघताच सुदाम्याच्या शक्तिहीन शरिरात अपूर्व उत्साहाचा संचार होई. त्याचे निस्तेज डोळे एका वेगळयाच आनंदानं चमकू लागत. सांदिपनींच्या आश्रमात कृष्णाबरोबरीनं केलेल्या मौजा सांगताना प्रत्यक्ष सरस्वतीच जणू त्याच्या जिभेवर प्रकट होई. कृष्णाच्या लग्नसमारंभात सेवन केलेल्या पक्कांन्नांचं तर तो इतकं रसभरीत वर्णन करी की ऐकणाऱ्यांची कल्पनेनंच पोटं भरावीत. त्यानंतर मात्र वस्तुस्थिती क्रूरपणे आपलं भान त्याला आणून देई आणि जड हृदयानं तो आपल्या उदयोगाला लागे.

त्याची पत्नीही त्याच्यासारखीच सच्छील असून जमेल तसा संसार चालवायची. पण एके दिवशी तिच्याही रागानं सहनशीलतेची सीमा ओलांडली. कृष्णाच्या वैभवाचं सुदामा नेहमीसारखं वर्णन करत असतानाच ती वैषम्यानं म्हणाली, तुमच्या मित्राच्या घरी सोन्याचा धूर आणि आपल्याकडे

मात्र चुली सतत थंड!

सुदामा विषण्ण हसून म्हणाला, अगं असतं एकेकाचं नशीब! आता आपल्या घरी दारिद्र्याची पूजा अठरा विश्वं बांधलेली याला कृष्ण तरी काय करणार?

का? उसळून ती म्हणाली, इतकं तुझ्याकडे आहे तर आम्हालाही त्यातलं दे की म्हणावं थोडंफार!

अगं आपण तसं कधी मागितलंय का त्याच्याकडे? मला खात्री आहे आपण त्याच्याकडे काही मागितलं तर ते आपल्याला आनंदानं दिल्याशिवाय तो राहणार नाही.

मग त्याच्याकडे जायचं आणि मागायचं! की आपले इथे कुणी हातपाय बांधून ठेवलेयत?

अगं तसं नव्हे पण मी असा फाटका आणि तो तर द्वारकेचा राजा...

आता का? इतके दिवस तर तुम्हीच म्हणताय ना की माझा कृष्ण अस्सा नि माझा कृष्ण तस्सा. म्हणे कधी तो आपल्याला दूर लोटणार नाही! घ्याच की मग एकदा परीक्षा आपल्याही नशीबाची म्हणते मी!

अग पण इतक्या कालानंतर भेट घ्यायची तर बरोबर काही चांगलीचुंगली भेटवस्तू नको का न्यायला?

मग न्या की. शेवटचे थोडे पोहे शिल्लक आहेत ते बांधून देते. द्या ते त्याला. द्वारकेच्या राजाच्या परममित्राकडे एवढंच द्यायला शिल्लक आहे म्हणावं!

खिन्न सुदामा पोहयांची पुरचुंडी कडोसरीला बांधून द्वारकेची वाट चालू लागला...

**'हाक सुदाम्याची' – वृत्त तुंगभद्रा**

आर्त माझ्या हाक आत्म्याची स्विकारी
दास तुझा मी सुदामा रे मुरारी ।।धृ ।।

दैन्यवाण्या जीवनी झालो भिकारी
भेटण्या आलो तुला मी एकवारी
अर्पिण्या घेवोनि पोहयांची शिदोरी
वाट मी तुझ्या महालाची विचारी ।।१।।

आश्रमा सांदीपनींच्या मौज भारी
गुजगोष्टी तूज सांगे सख्याहरी
सांगता मी अंतरीची शल्यं सारी
श्रीहरी धावोनि वेगे तू निवारी ।।२ ।।

त्या तुझ्या संगास मी त्यागोनि वैरी
मायपाशा स्वार्थबुद्धी अंगिकारी
होतसे माझी मति सारी विकारी
पोसतो देहा फिरोनी दारदारी ।। ३।।

अल्पबुद्धी सांगते माझी बिचारी
तूच आता दैन्यवस्था पूर्ण हारी
कामना ही पूतना निःशेष मारी
बैस माझ्या अंतरी मित्रास तारी ।।४।।

'श्रीकृष्ण माझा मित्र आहे' असं सांगत द्वारकेत त्याच्या महालाचा रस्ता विचारणाऱ्या सुदाम्याची मनसोक्त थट्टा झाली. पण कृष्णानं सुदाम्याला पहाताक्षणीच ओळखलं. उच्चासनावरून जवळ जवळ धावतच तो

खाली उतरला आणि सुदाम्याला घट्ट आलिंगन देऊन म्हणाला, बंधो, काय ही तुझी दशा! तू, वहिनी, मुलं सारी कुशल तर आहात ना?

सुदाम्याला कृष्ण ओळख देईलसासुद्धा भरवसा वाटत नव्हता. त्याठिकाणी इतकं आपुलकीनं केलेलं स्वागत पाहून प्रथम त्याला रडूच कोसळलं. त्याची भावावस्था लक्षात घेऊन कृष्णानं त्याला हळूच आपल्याशेजारी सुवर्णासनावर बसवलं. भावनांचा भर ओसरल्यावर सुदाम्यानं सारी कहाणी कृष्णाला साद्यंत कथन केली. कृष्णानं ती लक्षपूर्वक ऐकून सुदाम्याला विचारलं, वहिनीनं माझ्यासाठी काहीच भेट पाठवली नाही का?

उत्तरादाखल सुदाम्यानं आपल्या कडोसरीला लावलेली मळकट पोहयांची पुरचुंडी पुढे केली. तिच्यावर झेप घेत कृष्णानं ती उघडली आणि पोहयांचा एक बकाणा भरून तो समाधानानं मान डोलवत म्हणाला, वाहवा! आमच्या वहिनीची ही चविष्ट भेट मला फारच आवडली बरं!

नंतर कृष्ण सुदाम्याला रुक्मिणीच्या महालात घेऊन गेला. रुक्मिणीनंही अगत्यानं सुदाम्याचं स्वागत करून त्याच्या पाहुणचाराची जबाबदारी स्विकारली.

पंधरा दिवस मुखदुर्बळ सुदामा आता मागू, उद्या मागू करत राहिला पण कृष्णाकडे उघड मदत मागायचं त्याला धैर्य होईना! तो काळ कृष्णाच्या संगतीत घालवल्यावर आणि यथेच्छ पाहुणचार उपभोगल्यावर सुदाम्यानं म्हटलं, कृष्णा, आता मला परत गेलं पाहिजे!

आपल्या अंगावरची भरजरी वस्त्रं उतरवून परत आपली मलीन वस्त्रं त्यानं धारण केली. जड हृदयानं कृष्ण रुक्मिणीचा निरोप घेऊन तो निघाला. परतीच्या मार्गावर आपण आपल्या कुटुंबियांसाठी काही मागू शकलो नाही, आपण स्वतः मात्र गेले काही दिवस ऐषारामात घालवले असं त्याचं मन त्याला खात होतं.

पण कुचैल गावाच्या वेशीपाशीच उत्तम रेशमी वस्त्रं परिधान केलेली त्याची पत्नी आणि मुलं अनेक सेवकांसह त्याच्या स्वागताला उभी असलेली त्याला दिसली. अत्यंत आश्चर्यानं त्यानं पत्नीला विचारलं, हे सर्व तुम्हाला कुठून मिळालं?

हसतमुखानं ती उद्गारली, अहो असं काय करता? तुमच्या सांगण्यावरून कृष्णानंच तर सारं पाठवलं नाही का? एक सहस्त्र गाई, रथ भरभरून सोनं, मोती, वस्त्रं, काय काय अन् काय काय!

सुदामा ऐकतच राहिला! त्याच्या नयनांवाटे आनंदाश्रूंचा पूर अनिर्बंध वाहतच राहिला!!

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●

# श्री साईबाबांचा अमृतप्रसाद ''उदी''

वसंत गोडबोले

(मागील अंकापासनू पुढे....)

या व्याधी अंधश्रद्धेच्या मानल्या जातात. श्रीसाईबाबा अंधश्रद्धेच्या विरुद्ध होते. त्यांनी कधीच असल्या अंधश्रद्धांची पाठराखण केलेली नाही. हे लक्षात घ्यावे. डोळस श्रद्धा हाच त्यांचा भाव होता. परमेश्वरावर त्याचा पूर्ण विश्वास होता. ''अल्ला मालिक'' ते नेहमी म्हणत. या पीडा/व्याधि कशा नष्ट करावयाच्या त्यांचे कारण भक्तांच्या मानसिकतेशी असते. म्हणूनच त्यांनी गंडे, ताईत, यंत्र मंत्र इ. कसलेच प्रकार केले नाहीत. फक्त ''उदी'' हेच एकमेव साधन प्रयोगात आणले ज्यात दिव्य योगशक्ती प्रेरीत होती.

२) आधिभौतिक व्याधी : नानाप्रकारचे आजार होणे ही आधिभौतिक व्याधि. नाना रोग निर्माण होतात शरीरात. त्या बळावलेल्या रोगांनी, जर औषधोपचार नीट झाले नाहीत, तर माणसाला कायमचे अपंगत्व व प्रसंगी मृत्यु देखील येतो. काही अवयव निकामी होतात जसे अंधत्व, पक्षाघात, वाचा जाणे, कर्णबधीरता इ. तसेच काही आजार दमा, क्षय ई. शरीर पोखरत जातात. महारोगाने अवयव झडतात. एक ना अनेक व्याधी ज्वर, खोकला इ. सर्व आधिभौतिक व्याधि. कॅन्सर सारख्या व्याधींवर तर अजूनही पूर्ण बरे करणारे प्रभावी औषध नाही. दुसरा भाग हे उपचार खूप खर्चिक असतात शिवाय परिणाम कायमचे होतात असे नाही. पुन्हा व्याधी उद्भवतातच. खर्च, परिणामाची अशाश्वता, बरे होण्यास लागणारा कालावधी, दगदग इ. कारणांनी जनसामान्य साधुसंतांकडे वळतात. विशेषतः गोरगरीब तर वळतातच शिवाय काही वेळा गर्भश्रीमंतही. श्री साईबाबांची उदी अनेक असाध्य आजारांवर परिणामकारक ठरली, ठरत आहे व ठरत राहीलच पुढेही. याची उदाहरणे पुढे येतीलच, या लेखात.

३) आध्यात्मिक व्याधि : या व्याधिंचे स्वरुप वेगळे असते. अध्यात्मिक मृत्यु टाळा येत नाहीत कारण तो परब्रह्माचाच नियम असतो – उत्पत्ती, स्थिती व लय. हा तो कधीही बदलू शकत नाहीत. अगदी क्वचितप्रसंगी ते देवाण घेवाण स्वरुपात पुढील जन्मातील आयुष्याची काळाची उधार उसनवार करुन लय स्थितीचा कालावधि थोडा वाढवतात एवढेच पण अमर कोणालाच करत नाहीत कारण त्यांनाही जावेच लागते.

या सर्व तीनही प्रकारच्या व्याधीनी ग्रस्त माणसे श्रीसाईबाबांकडे येत त्यांना बाबा उदी देवून व्याधीमुक्त करीत. याची काही उदाहरणे संक्षेपात देत आहे. (श्रीसाईबाबा ही उदी प्रसाद म्हणून देत, अंगठ्याने ती कपाळावर फासीत व तोच हात भक्ताचे शिरावर ठेवीत असत.)

१) माधवराव देशपांडे उर्फ शामा यांच्या

भावजयीला प्लेग गाठी होऊन ती अत्यवस्थ असल्याने त्याने भावजयीला भेटायला जाणेस परवानगी मागताच बाबांनी तूं जाण्याचे कारण नाही. माझी उदी तिकडे पाठव सर्व ठिक होईल त्याप्रमाणे त्याने उदी पाठवली व त्याचे भावाने आपल्या पत्नीस कपाळी व प्लेग गाठीवर लावताच रात्री तिला दरदरुन घाम फुटला व प्लेग गाठी निमाल्या व ती दुसरेच दिवशी नित्यक्रमाप्रमाणे कामास लागली.

२) दादासाहेब खापर्डे सहकुटुंब शिर्डीस बाबांचे सान्निध्यात रहावयास गेले असता त्यांचे मुलाला एकाएकी ताप चढून प्लेग गाठी आल्या. त्यांचे त्यांचे पत्नीने बाबा लेंडीबागेकडे सायंकाळी जातांना त्या मुलास त्यांचे पायावर ठेवून ''काय करु यास प्लेगने गाठले'' म्हणताच बाबांनी ''चांगले होईल. आकाशात भरुन आलेले काळेकुट्ट ढग जाऊन निरभ्र होईल'' असे सांगत असतांना त्यांच्या उदीत त्या बाईने मुलाचे कपाळी लावले व बाबांकडे बघते तो बाबांनी कफनी वर केलेली व त्यांचे कमरेवरील भागात प्लेग गाठी दिसल्या. मुलाचा रोग स्वतःवर घेवून त्यास मृत्यु पासून वाचविले.

३) नारायण गावच्या रंगेल वृत्तीच्या भीमाजी पाटलास ज्याचे उभे आयुष्य रंगेलपणात गेलेले त्यास शेवटी क्षय होवून अगतिक अवस्थेत बाबांजवळ आला. त्याची ओळख चांदोरकरांनी बाबांना करून दिली व त्याने आपली सर्व कहाणी बाबांना सांगताच, ''तू पूर्वजन्माची फळे भोगत आहेस. मी काही करू शकणार नाही.'' असे सांगताच त्याने बाबांचे पाय घट्ट धरुन फोडलेल्या हंबरड्याने बाबांचे हृदय पिळवटले गेले व ते म्हणाले ''ठीक काळजी नको करुस. मशीदीत आला आहेस. पश्चातापाने पूर्वीचे सर्व जळून खाक झाले. अल्ला तेरा भला करेगा.'' त्याची राहण्याची व्यवस्था भीमाबाईचे घरात करुन त्यास रोज उदी प्रसाद देऊ लागले. आश्चर्य घडले. त्याचा अंतिम टप्प्यातील क्षय पूर्ण बरा झाला व त्याने पुढे ''साईव्रतपूजा'' हा प्रघात पाडला.

४) नानासाहेब चांदोरकरांची बाळंतपणास आलेली मुलगी प्रसुती अडल्याने संकटात असतांना जामनेर येथे, तिची व्यथा शिर्डी बाबांनी जाणून व चांदोरकर पती पत्निंचा धावा ऐकून जळगांवला जाणाऱ्या रामगीरबुवा हाती त्यास मध्येच जामनेरला उतरुन चांदोरकरांना उदी देण्यास सांगितले व जामनेरला जाण्यास ते जळगावला उतरताच त्यांचे जवळ पैसे नसतांना टांगेवाल्याचे रुपात टांगा घेवून त्यांना चांदोरकरांचे घरी पोचवून अदृश्य झाले. उदी चांदोरकरांनी पाण्यात कालवून मुलीस पाजली व थोड्यावेळातच तीन दिवस अडलेली प्रसुती तत्काळ सुखरुप झाली.

५) मालेगावच्या डॉक्टरच्या पुतण्यास हाडव्राण क्षय झालेला जो अनेक औषधोपचार व थोर डॉक्टरांचे सल्ला घेवून औषधोपचारांनी बरा होईना तेव्हा त्यास त्यांनी बाबांकडे आणून त्यांचे चरणी लीन होवून कृपादृष्टीची विनंती करताच बाबांनी ''या द्वारकामाईचा आश्रय ज्याने घेतला त्यास दुःख सहन करावेच लागणे नाही. निर्धास्त रहा. उदी अंगाला चोळत रहा त्याच्या, आठवड्यात

तो सुधारेल.'' मुलास जवळ घेवून अंगावरुन हात फिरवून माझ्या रुपाने कृष्णोपासना करा त्यास शरण जा. आठ दिवसात मुलगा खडखडीत  बरा झाला.

६) डॉ. पिल्लेंच्या पायाला पाच सहा ठिकाणी झालेला नारु उदीप्रभावाने बरा केला.

७) मोरेश्वर प्रधान या परमभक्ताची(जे मुंबई हायकोर्टात जज्ज होते) दम्याची व्याधी जी बाबांनी चिलीम ओढायला लावून कायमची घालविली तिचा उद्रेक बाबांची उदी घेण्याने देहत्याग करते वेळी गेला.

८) ज्योतिन्द्र तर्खड ज्यांना भाऊ असे बाबा संबोधत त्याला वेताळापासून उदीने वाचविले तसचे त्यांच्या पणजीला मरणासन्न आजारी असतांना त्यांच्या उदीनेच वाचविले.

९) त्याच भाऊंना त्यांनी मूठभर उदी देवून प्राणपणाने जतन करण्यास सांगितले व सांगितले की ही तुझ्या खूप कामी येईल. अरे मेलेल्या माणसालाही जिवंत करण्याचे सामर्थ्य उदीत आहे हे लक्षात ठेव.

श्रीसाईबाबाही खुषीत आले की ''रमले राम आयोजी आयोजी । उदीकी गोनिया लायोजी ।।'' हे ध्रुपद वरचेवर सुस्वरात म्हणत हे लक्षात घ्यावे.

असे असंख्य उदीसामर्थ्याचे अनुभव प्रत्यही येत आहेत व येतच राहणार यात शंकाच नाही उदी म्हणजेच श्रीसाईबाबा असेच मानावेच लागते एवढे दिव्यत्व उदीत आहे.

श्रीसाईबाबांनी उदीचे सामर्थ्याचे श्रेय स्वतःकडे कधीच घेतले नाही उलट ते म्हणत की ''त्या अगाध परमेश्वराचे प्रेम मी संपादन केले आहे. त्याची माझ्यावर पूर्ण मर्जी आहे त्याचेच सामर्थ्य या उदीत संक्रमीत झाले आहे''

मानवी जीवन केवळ भौतिकावर लक्ष केन्द्रित केल्याने यशस्वी होत नाही. जरी बुद्धीसामर्थ्य विलक्षण आहे तरी ती मानवाच्या सर्व गरजा सर्वकाळ पूर्ण करु शकते असे नाही. त्या बुद्धीपलीकडे भावना व श्रद्धा यांचा विस्तीर्ण प्रांत / भाग असतो जेथे जीवाशिवाची भेट / भेटी होतात. जीवाला शिवाचे अस्तित्वाची जाणीव झाली म्हणजे श्रद्धाच यापुढे त्याचा उद्धार करु लागते व तिच्याशिवाय जीवनास पूर्णता येतच नाही व केवळ तिच्यामुळेच कधीही न सुटलेली कोडी सुटू शकतात एवढे तिचे विलक्षण सामर्थ्य आहे. बाबांच्या उदीचे जे लोकविलक्षण अनुभव येतात याचे उत्तर हेच आहे श्रद्धेचे बळ. बाह्यविश्वात बुद्धीकार्य, त्या बुद्धीने मनाचे अंतर्विश्वात प्रवेश करु नये व अंतर्विश्वातील श्रद्धेचे कार्य त्यात बुद्धीने प्रवेश करु नये.

ही अंतर्विश्वातील श्रद्धा जोपासली की तिचे लोकविलक्षण सामर्थ्य व्यक्त होते.

उदीचे लोकविलक्षण सामर्थ्य भक्तांची श्रीसाईबाबांवरची असीम श्रद्धा व श्रीसाईबाबाही असिम श्रद्धेने परमात्मरुप प्राप्त झाले आहे हे लक्षात घ्यावे.

या लेखांत मी नमूद करु शकतो की कामधेनू व कल्पतरुबद्दल आपण ऐकले आहे.

वाचले आहे पण या दोनही वस्तू / गोष्टी पुराणातील. आज त्या कोठे मिळणार / दिसणार? पण त्याचे उत्तर एकच या दोन्हीचे गुण एकत्र असलेली, कामधेनू कल्पवृक्ष यांचा संगम असलेली व त्यापेक्षाही विलक्षण सामर्थ्य असलेली एकमेवाद्धितीय अशी श्रीसाईबाबांचा अमृदप्रसाद म्हणजेच उदी. उदी, उदी अन केवळ उदीच होय.

भक्तांनी खऱ्या श्रद्धेने उदी वापरावी व जीवनातील आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक आपत्तीतून आपली जीवननौका सुखरुप भवसागरातून पैलतिरी न्यावी श्री साईकृपेने. हा लेख श्रीसाईबाबांचे चरणी अर्पण करतो अनन्यभावे.

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

●●●

(पृष्ठ क्र.४ वरून... **संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)

**सन्तः एव सतां नित्यमापदुद्धरणक्षमाः।।**[३७९]

मोठेच मोठ्यांना संकटातून सोडवू शकतात.

दुसरी ओळ :

**गजानां पङ्कमग्नानां**
**गजा एव धुरधराः।।**

हत्ती चिखलात रुतला तर हत्तीच त्याला बाहेर काढू शकतो.

**अरण्यरोदनन्याय।**[३८०]

व्यर्थ प्रयत्न करणे.

इति शिवम्। क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

मार्च / एप्रिल २०१७ मध्ये सद्धर्मचा संगणक नादुरुस्त (Virus attack) झाल्यामुळे सर्व माहिती पुसली गेली होती. ती पावत्यांची माहिती परत मिळवून पावत्या तयार केल्या आहेत. यात काही चूक झाली असल्यास क्षमस्व. तसे झाले असल्यास श्री. प्रकाश दीक्षित (भ्रमणध्वनि- ९८१९६९३१९५ वा ९०८२९९०४३१ किंवा ०२२ २५४७२००५ वर) यांच्याशी संपर्क साधावा, योग्य ती दुरूस्ती करणे शक्य होईल व केली जाईल.

सुमारे २५-३० वर्षांपूर्वी सद्धर्मने वाङ्गनिश्चय विधी पोथी ही प्रसिद्ध केली होती. वारंवार झालेल्या स्थान बदलमुळे आज त्याची प्रत आज सद्धर्म जवळ उपलब्ध नाही. तरी आपल्याकडे ती असल्यास आपण त्याची झेरोक्स प्रत पाठवू शकाल तर आम्ही त्यांचे आभारी राहू. सहकार्य मिळेल असा विश्वास आहे.
– कार्यकारी विश्वस्त

भगवान श्रीदत्तात्रेय हे अवधूतकुलशिरोमणी आहेत. विवेक वैराग्य संपन्न व आत्मसाक्षात्काराची इच्छा असणाराच ब्रह्मचारी संन्यासदीक्षेनंतर संन्यासी होतो. ज्ञानाचे अधिकाराचे प्रमाणानुसार अशा संन्याशांचे सहा प्रकार उपनिषदात सांगितले आहेत ते असे – १) कुटीचक्र २) बह्दक ३) हंस ४) परमहंस ५) तुरियातील व ६) अवधूत यामध्ये पहिल्या २ प्रकारचे संत्वार म्हणजे कुटीचक्र व बह्दक प्रकारातील शिखा–सूत्र धारण करतात व ते त्रिदंडी संन्यासी म्हणून ओळखले जातात. हंस व परमहंस हे शिखा–सूत्र विरहीत एक दंडी संन्यासी असतात. पहिल्या ३ प्रकारचे संन्याशांसाठी म्हणजे कुटीचक्र, बह्दक व हंस या प्रकारातील संन्याश्यांसाठीच शास्त्रात 'क्रमसंन्यासाचे' विधान सांगितले आहे तर अन्य तीन म्हणजे परमहंस, तुरीयातील व अवधूत या प्रकारातील संन्याश्यांसाठी कटीसूत्र, कौपिनवस्त्र, कमंडलु व दंड या वस्तू धारण करण्याची त्यांना आवश्यकता नाही असे प्रतिपादन केले आहे. या संन्यासामध्ये 'वैराग्ययुक्त संन्यास' यास 'विविदिषुसंन्यास' तर ज्ञानयुक्त संव्यासास 'विद्वत संन्यास' म्हणतात. तुरीयातील व अवधूत यांचे बाबतीत ''पूर्ण ज्ञान'' हाच त्यांचा दंड म्हणजेच 'ज्ञानमेवास्य दण्डः' हाच होय.

'अवधूत' ही परमेष्ठ अशी अवस्था आहे की त्या अवस्थेत वर्ण, आश्रम, दंड, कमंडलु या बाह्य उपाधींची आवश्यकताच नसते. निर्वाण उपनिषदात 'विचारःदंडः' अशा उच्च अवस्थेतील महात्म्यास 'अत्याश्रमी' (सर्व आश्रमांच्या अतीत गेलेला), अवधूत, स्वयं ब्रह्मपुरुष, आत्मक्रिड, आत्माराम, सर्व विधी–निषेधांच्या पार गेलेला, भेदाभेदाच्याही पार गेलेला असे म्हटले आहे/जाते. 'त्रिपुरा रहस्य' या ग्रंथात श्रीदत्तात्रेयांना 'परमअवधूत', 'अवधूतश्रेष्ठ', 'अवधुतकुलशिरोमणी' असे संबोधले आहे.

भगवान दत्तात्रेयांनी 'अवधूतगीतेत' त्यांचे शिष्य 'श्रीकार्तिकेयास' 'अवधूत' या शब्दाचा अर्थ सांगितला आहे तो असा –

**''आशापाशविनिर्मुक्त, आदिमध्यान्तनिर्मला।**
**आनंदे वर्तते नित्यं अ कार तस्य लक्षणम् ।।१।।**
**वासना वर्जिता येत, वक्तव्यं च निरामय।**
**वर्तमानेषु वर्तेत नित्यं, त कार तस्य लक्षणम् ।।२।।**
**धूलीधूसर गात्राणि, धूतचित्तो निरामयः।**
**धारणाध्याननिर्मुक्तो, धू कार तस्य लक्षणम् ।।३।।**
**तत्वचिंता धूता येन, चिंता चेष्टा विवर्तित।**
**तमोऽ हंकार निर्मुक्तस्त्, कार तस्य लक्षणम ।।४।।''**

याचा अर्थ आशापाश यापासून मुक्त, आदि, मध्य, अंत्य या सर्व स्थितीत निर्मळ, सदैव आनंदी (अ), वासनारहित, वासनांपासून मुक्त, वासनांचा त्याग केलेला, बोलण्यात पवित्रता म्हणजचे शुद्ध पवित्र वाणी, निरामयता व वर्तमानात राहून संचार करणारा / व्यवहार करणारा / वागणारा (व), सर्व अवयव

मलरहीत, तसे धुलीलीप्त शरीर, शुद्ध चित्त, निरामय मन, निर्मळ अंतःकरण, धारणा ध्यान आदि पाशातून मुक्त वा या गोष्टींची आवश्यकता नसणारा म्हणजेच सहजभावस्थित संपन्न (धू) असा, तत्वाची चिंता नसलेला, चिंता चेष्टा यापासून मुक्त वावरणारा, अहंकाराचा स्पर्शही नसलेला व त्यापासून मुक्त असणारा (त) अशा सर्वाचे (सर्वाविष्काराचे) एकत्रित रुप म्हणजेच एकमेव अशी 'अवधूत अवस्था' ही अवधूतावस्था म्हणजे परब्रह्मत्वच असते.

ईशावास्योपनिषदात ८ वी ऋचा परब्रह्मस्वरुप वर्णन करणारी आहे त्यातूनही सिद्ध होते/कळते की अवधूतावस्था परब्रह्मस्वरुप आहे. ती ऋचा अशी -

''**स पर्यगाच्छुक्रमकायव्रणमस्नाविरं शुद्धमपापविद्धम् ।**
**कविर्मनीषी परिभूः स्वयंभूर्याथातत्स्योऽर्यान व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः।।**''

समदर्शी भक्ताला क्रोध, लोभ, मोह, द्वेष आणि शोक हे भाव स्पर्शही करीत नाहीत म्हणून त्याचे मन परमशान्ती व समाधानात दृढरीत्या स्थिर असते व असा पुरुष परमेश्वररुपच होतो.

श्रीमद आद्य शंकराचार्यांनीही अवधूतावस्थेचे वर्णन केले आहे ते असे -

''**मौने मौनी गुणिनि गुणवान पंडिते पांडितश्व।**
**दीने दीनः सुखिति सुखवान भोगिनि प्राप्तभोगः।**
**मूर्खे मूर्खो युवतिषु युवा दाग्मिनि प्रौढवाग्मी।**
**धन्यः कोऽपि त्रिभुवनजयी योऽवधूतेऽवधूतः।।**''

याचा अर्थ जो मौन धारण केलेल्या लोकांबरोबर मौन असल्याप्रमाणे आचरण करतो, गुणवान लोकांबरोबर सुखी असल्याप्रमाणे आचरण करतो. भोमीजनांबरोबर (विषयासक्त) भोगासक्ताप्रमाणे वर्तन / आचरण, मूर्ख लोकांबरोबर मूर्खाप्रमाणे, तरुणींबरोबर तरुणीप्रमाणे, वक्त्यांबरोबर प्रौढवक्त्यांप्रमाणे आचरण असणारा, अवधूतांबरोबर अवधूताप्रमाणे वागणारा, त्रैलोक्यात अत्यंत आदरणीय असा महापुरुष म्हणजेच 'अवधूत'.

भगवान दत्तात्रेय व मुनी 'श्रीसांस्कृति' यांचेमधील अवधूत अवस्थेविषयी (त्याची लक्षणे व स्थिती) चे संवादात जो ''अवधूतोपनिषदात' आहे त्यात भगवान दत्तात्रेय सांगतात 'अतीवर्णाश्रमी (अवधूत) स्वेच्छाभ्रमणी तसेच कधी वस्त्र परिधान करणारे तर कधी दिगंबर तसेच त्यांचे भ्रमणात असा विचार त्यांचा असतो की या व परलोकातील फलप्राप्तीहेतू व मुक्तीप्राप्तीहेतू यांचेशी माझे काहीही कर्तव्य नाही. मी ब्रह्मानंदाने पूर्ण आहे. मला कसलीच पुत्र वा धन वा परलोकप्राप्ती यांची आशा व आकांक्षा नाही. मी निद्रा, भिक्षा, स्नान, अशुचिता यांनी रहीत आहे. मला मनन, चिंतन, निदिध्यास, समाधी इ. कश्याचीही आवश्यकता नाही. मी निर्लेप व अकर्ता आहे जरी मी शास्त्रसंमत मार्गाचरण / आचरण केले तरी त्यात कोणतीच हानी नाही. देहाने स्नान, देवपूजा, भिक्षाकर्म केले व वाणीने जप केला. बुद्धीने परब्रह्मस्वरुप ध्यान केले. पण मी काहीच करत नाही/ पण मी 'साक्षी'

(कुटस्थ) काही करीत नाही आणि करवूनही घेत नाही. मी आत्म्याचा (आत्मस्वरुपाचा) यथार्थपणे अनुभव घेतो. 'ब्रह्मानंद' मला स्पष्ट स्वरुपात जाणवतो. मला कोणतेही कर्तव्य आता करावयाचे शिल्लक राहिलेले नाही. मी पूर्णपणे तृप्ततेला पोहोचलो आहे म्हणूनच मी धन्य आहे, धन्य आहे, धन्य आहे.

'श्रीमद् भागवत' (७-१३) या ग्रंथात दत्तात्रेय प्रल्हाद संवाद आहे. त्यात प्रल्हादाचे प्रश्नाचं श्रीदत्तात्रेय उत्तर देतात ते असे, ''कधी मी सुंदर वस्त्रे परिधान करतो, कधी वत्कले तर कधी दिगंबर अवस्थेतही राहतो. मी नेहमी चित्तात संतुष्ट असतो. मी कधी धूलीयुक्त जमीनीवर शयन करतो तर कधी राजमहाली छत्रयुक्त पलंगावर झोपतो. कधी शरीरावर भस्माचे लेपन करतो तर कधी सुगंधी चंदनाचे. कधी पिशाच्चाप्रमाणे पायी हिंडतो तर कधी घोडे, हत्ती, रथ यामध्ये विराजमान होवून भ्रमण करतो. मी विषयासक्त लोकांची निंदा करत नाही व बुद्धीमान लोकांची स्तुतीही करत नाही. सदैव प्राणिमात्रांच्या सर्वांच्या कल्याणाची इच्छा करतो व स्वस्वरुपानंदात लीन असतो.

अवधूतगीतेत (१-७३) मध्ये 'ज्याने मोहल्यात पडलेल्या फाटक्या वस्त्रांचे तुकडे एकत्रित करून गोधडी बनविली व परिधान केली, ज्याचा मार्ग पुण्य, पुण्य-पाप, पाप यांनी रहीत आहे, जो शून्यस्थानी (आत्म्याचे ठिकाणी) लीन आहे, जो वासनारुपी वस्त्राशिवाय आहे, जो अत्यंत शुद्ध असून मायामलरहीत आहे आणि समरसमग्न आहे तो 'अवधूत' आहे. भगवान दत्तात्रेयांची योग व ज्ञानस्थिती परमोच्च आहे म्हणूनच ते 'अवधूत श्रेष्ठ /अवधूत सम्राट' आहेत. भगवान श्रीदत्तत्रेयांना गोरक्षनाथांनी 'ज्ञान-दीप-बोध' या ग्रंथात स्वयंवेदपुरुष, अवधूतश्रेष्ठ, आदिगुरु असे संबोधिले आहे.

भगवान दत्तात्रेयांची ज्ञान व योग यामधील स्थिती ही परमोच्च आहे म्हणूनच त्यांना 'अवधूतसम्राट' वा 'परमावधूत' असे म्हणतात. धर्मग्रंथांतही भगवान श्रीदत्ता यांना आदिगुरु, विश्वगुरु, युगगुरु, सर्वत्र समदर्शी, महायोगी, योगीश, योगपती, योगानंद, योगमार्ग प्रवर्तक, महामुनी, महाविष्णु, महायोगेश्वर इ. इ. नावांनी संबोधिले आहे.

गोरक्ष-सिद्धांत-संग्रह ग्रंथातही अवधूतलक्षण वर्णनाचा श्लोक आहे तो असा-

**'वचने वचने वेदाः तीर्थानि च पदे पदे।**
**दृष्टौ दृष्टौ तु कैवल्यं सोऽवधूतः श्रियेऽस्तु नः।'**

याचा अर्थ 'ज्याची वाणी म्हणजे जणू वेदवाणी, वेदतुल्य पवित्र, ज्याचे प्रत्येक पाऊल म्हणजे तीर्थच, ज्याची दृष्टी कैवल्यमय तो महापुरुष 'अवधूत' होय.

**'एक हस्ते धृतस्त्यागो भोगश्चैककरे स्वयम्।**
**अलिप्तस्त्यागभोगाभ्यां सोऽवधूतः श्रियेऽस्तुनः।।'**

याचा अर्थ ज्याच्या एका हातात 'त्याग' आहे व दुसऱ्या हातात 'भोग' आहे पण तरीही त्यामध्ये त्यागाचा अभिमान नाही आणि भोगाची आसक्ति नाही असा महापुरुष 'अवधूत' उच्च कोटीच्या 'अवधूता-संबंधी

सिद्ध सिद्धांत पद्धती (६-१८) त असा श्लोक आहे -

**'अव्यक्तं व्यक्तमाधंते व्यक्तं सर्व प्रसत्यलम।**
**स सत्यं स्वान्तरे सत्रः सोऽवधूतो भिधीयते।।'**

याचा अर्थ अत्यंत श्रेष्ठ पुरुष आपल्या भक्तांच्या कल्याणासाठी कधी आपले खरे स्वरुप प्रकट करतात तर कधी प्रकट रुपातही गुप्ततेच्या आवरणाने वेढून टाकतात आणि जो खरोखरच ज्योतीरुपाने आमच्या अंतःकरणात स्थित आहे तो महापुरुष म्हणजेच 'अवधूत' होय.

भगवान दत्तात्रेयांचे अवधूतावस्थेबद्दल 'रुद्रयामल-तंत्र' या ग्रंथातील श्लोक असा -

**'कदा योगी कदा भोगी कदा नग्नपिशाचवत।**
**दत्तात्रेयो हरिः साक्षात भुक्ति-मुक्ति प्रदायकः।।'**

याचा अर्थ - कधी आचरण योग्यासारखे, कधी भोक्त्याप्रमाणे, कधी दिगंबर रुपात तर कधी पिशाचाप्रमाणे भ्रमण करीत राहतात, तरीही साक्षात हरिस्वरुप असलेल्या 'भगवान श्रीदत्तात्रेय यांचे ठिकाणी / ठायी आपल्या भक्तांना लौकिक सुख व मोक्ष-पारमार्थिक सुख देण्याचे सामर्थ्य आहे.'

आणखी एक श्लोक असा आहे -

**'अवभासात्मको भासः प्रकाशे सुखसंस्थितः।**
**लीलया रमते लोके सोऽवधूतोऽ भिधीयते।।'**

याचा अर्थ - सर्व विश्वाला प्रकाश देणारा, सूर्य-चंद्रालाही प्रकाश देणारा, सदैव स्वात्मसुखी लीन, स्वच्छंदपणे लिलया हिंडणारा असा महापुरुष 'अवधूत' होय.

सिद्ध-सिद्धांत पद्धती (६-१) यात अवधूताबद्दल 'सर्वान् प्रकृतीविकारात अवधूतोति इति अवधूतः।' म्हणजे तोच अवधूत होय जो सर्व प्रकृति-विकारांना धुवून टाकून त्यांचे मालीन्य नष्ट करतो. तुरियातील उपनिषदातही असे प्रतिपादले आहे की 'अवधूतावस्थेत राहणारा महापुरुष दुर्लभस्तर असून तो नित्य पवित्र, साक्षात वैराग्यमूर्ती, ज्ञानस्वरुप व वेदपुरुषच असतो. प्रत्येक क्षणी त्याचे चित्त ईश्वरात गुंतलेले व साक्षात ईश्वरच त्याचे ठायी वास करतो.'

असा महापुरुष 'अवधूत' हा स्वस्वरुपसंधाने संसार मिथ्या आहे हे जाणून सर्व वस्तूंचा त्याग करून, स्वशरीरास प्रेतवत स्वरुपात पहातो. दिगंबर अवस्थेत राहून, सुखदुःख, मानपान / मानापमान, शीत-उष्ण, हर्ष-शोक, स्तुती-निंदा, लाभ-हानी याकडे समदृष्टीने पाहतो. वर्णाश्रमात राहूनही आचाररहीत, उन्मत नाही तरी बालोन्मत्त, पिशाचाप्रमाणे एकाकी संचार व स्वस्वरुपसंधाने निरालंबत्वाचा 'अवलंब' करून तो एक 'अद्वैतनिष्ठापरायण' दर्शवित असतो.

स्वतः भगवान श्रीदत्तात्रेयांनी श्रीसांस्कृतीमुनींना अवधूत व ज्ञानीपुरुष लक्षण यांचे स्वरुपासंबंधी त्यांनी (मुनींनी) विचारलेल्या प्रश्नास जे उत्तर दिले आहे ते अत्यंत समर्पक असून त्यासंबंधीचा श्लोक

अर्थासहीत येथे देत आहे. भगवान श्रीदत्तात्रेयांना 'अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त' असे त्यांचे भक्त जयघोष करून भक्तीभावे नमस्कार करतात ते यामुळेच.

तो श्लोक असा -

**'अक्षरत्वात वरेण्यत्वात धूतसंसारबन्धनात।**
**तत्त्वमस्यादिलक्ष्यत्वात 'अवधूत' इतीर्यते।।'**

याचा अर्थ - ज्या महापुरुषाला 'अक्षर-परब्रह्माचा' साक्षात्कार झालेला आहे किंवा ब्रह्मस्वरुप / शिवस्वरुप झाल्यावर ज्याने कायासिद्धी (देहाचे अजरत्व व अमरत्व) प्राप्त केले, जो सर्व प्राणीमात्रांना पूजनीय, ज्याचे संसारबंध गळाले आहेत व ज्याच्या प्रत्येक क्षणाचे लक्ष 'तत् त्वम् असि' (तो तूच आहेस) हे आहे आणि स्वस्वरुपाची जाणीव ज्याला सतत स्फुरते असा हा महापुरुष म्हणजेच 'अवधूत' आहे.

श्रीमहाकवी म्हणतात की गुरुपरंपरा नष्ट झाल्यावर जेव्हा सर्व श्रुती लोप पावल्या तेव्हा वैदिक धर्मरक्षणार्थ व लुप्त श्रृती उद्धारार्थ भगवान दत्तात्रेयांनी महर्षि अत्री व सती अनुसयेपोटी त्यांचे पुत्र रुपाने जन्म घेतला. येथे भगवंताने स्वतःचेच पुत्ररुपाने दान केले त्या अत्रि-अनुसया दांपत्यास, म्हणून 'दत्त' हे नाव तर अत्रिमुनीचा पुत्र म्हणून 'आत्रेय' हे नांव व या दोन्ही नावांचे एकत्रिकरण करून 'दत्तात्रेय' हे नाव पडले / प्रचलीत झाले. वैदिक धर्मात चैतन्यनिर्मिती हेच त्यांचे कार्य. अनेक ग्रंथात उदाहरणार्थ वेद, उपनिषदे, महाभारत, भागवत, हरिवंश, पुराणे, त्रिपुरारहस्य, कथाबोध, रुद्रयामलतंत्र, परशुरामकल्पसूत्र, दत्तकल्प, दत्तवज्रकवच यातही भगवान दत्तात्रेयांचा महिमा वर्णन केला आहे.

भगवान श्रीदत्तात्रेय 'आत्मविद्याउपदेशकातही' सर्वश्रेष्ठच आहेत. योगसाधनेमध्ये येणाऱ्या विघ्नांपासून रक्षण करणारे आहेत. त्यांनी खालील प्रमुख महान भक्तांना विविध उपदेश करून वरदान दिले आहे ते येणे प्रमाणे. (विस्तारभयास्तव व या लेखाशी तसा संबंध नसल्याने ते सर्व उपदेश त्यांचे शीर्षकाने दिले आहेत.)

१) मदालसापुत्र राजा अलर्क - योगसिद्धी, योगीचर्या, निष्काम बुद्धी, परमयोग (म्हणजे ब्रह्मविद्या) दान केली.

२) प्रल्हाद (कयाधूसूत) - परमसंतोष व परम वैराग्य यांचा उपदेश व ज्ञानमार्ग विवरण

३) राजा आयु - सुपुत्रप्राप्ती वरदान

४) राजा यदु - जीवन्मुक्तता

५) सहस्त्रबाहू (कार्तवीयीजुन) - सहस्त्रबाहुत्व, अधर्माचरणनाश, स्वधर्मसेवन भूमंडलाधिपत्यत्व, कोणत्याही शत्रूपासून अजिंक्यत्व व शेवटी त्रिलोकीप्रसिद्ध पुरुषाचे हातून मरण.

भगवान श्रीदत्तात्रेयांनी साधक जीवनही जगून दाखविले. आदर्श साधक कसा असावा हा आदर्श घालून दिला. गौतमी वनात दीर्घकाल तप व शिवाराधना केली. त्यांनी २४ गुरु केले व प्रत्येकाकडून वैशिष्ट्या असणारा गुण ग्रहण केला. ते २४ गुरु व

प्रत्येकाकडून घेतलेला विशिष्टगुण येणेप्रमाणे आहेत -

१) पृथ्वी - सहनशीलता, क्षमाशीलता, परोपकारिता
२) वायु - निर्लेपता, अनासक्ति
३) आकाश - व्यापकत्व, असंगता
४) जल - पावित्र्य, शुद्धत्व
५) अग्नि - उपयुक्तता, तेजस्विता
६) चंद्र - आत्माअविनाशत्व, देहनश्वरता
७) सूर्य - शून्य भेदाभेदत्व
८) कपोत - अतिस्नेह व अतीसंगत्याग
९) अजगर - स्थिती संतोषत्व
१०) समुद्र - स्थिरता, गंभीरता
११) पतंग - रुपासक्तीचा नाश
१२) भ्रमर - सारसंचय व मधमाशी-संग्रहव्यर्जना
१३) हत्ती - स्पर्श आसक्ति त्याग
१४) मधुहर्ता - स्वसंचय त्याग-परसंचय ग्रहण
१५) हरिण - शब्दासक्ति त्याग
१६) मीन - रसाक्ति त्याग
१७) वेश्या - आशात्याग, नैराश्यग्रहण
१८) कुरर पक्षी - प्रिय वस्तुत्याग
१९) बालक - चित्ताशून्य वृत्ती
२०) कुमारी - एकाकी रहाणे
२१) शरकृत - चित्तएकाग्रता
२२) सर्प - गृहनिर्माण आसक्तित्याग
२३) कोळी - स्वतंत्रता, निर्माण-संहार
२४) भृंगी - ध्यानद्वारा भगवत्सारुण्य
आणि शेवटी स्वदेह-विवेक व वैराग्य

प्रत्येक सजीव वा निर्जीव वस्तूत काहीतरी गुण असतोच जो जीवनास उपयुक्त ठरतो हेच यातून भगवान दत्तात्रेयांनी दाखवून दिले आहे.

भगवान दत्तात्रेय 'अव्यक्त लिंग' व 'अव्यक्त आधार' परमहंस होते. त्यांना परमहंसाप्रमाणेच परमअवधूत असे जाबालोपनिषदात 'श्रीदत्तात्रेय-सांस्कृति' संवादात म्हटले आहे. मांर्डेय पुराणात जम्मासूर राक्षसावर देवांनी भगवान दत्तात्रेयांच्या कृपाशिर्वादानेच विजय मिळवला असे म्हटले आहे.

सत्ययुगामध्ये भगवान दत्तात्रेयांचा अवतार हा 'स्वयंभू' मन्वंतराआधी झाला. संसारी लोकांचे दुःख व ताप नाहीसे करण्याच्या हेतूनेच ते स्वेच्छेने प्रकट झाले व म्हणूनच जोपर्यंत जगात दुःख व ताप आहेत. तोपर्यंत ते देहत्याग न करिता एकमेवभावे व एकच देह धारण करून राहणार आहेत व महालय कालापर्यंत त्यांचा अवतार व अस्तित्व मानले आहे व मानले जाते. राम, कृष्ण यांनी अवतारकार्य संपल्यानंतर देहत्याग केला. कारण त्यांचे कार्य एका विशिष्ट हेतूने होते व तो हेतू पूर्ण झाल्यावर त्यांना अवतारसमाप्ती करणे भाग होते. पण भगवान श्रीदत्तात्रेय हे शरणांगताचे दुःख निवारण्यासाठी अवतीर्ण झाले आहेत. त्यामुळे कल्पांतापर्यंत ते एकाच देहाने रहाणार आहेत. स्मरण करताच दर्शन देणारे व यथासंभव त्यांचे दुःख हरण करणारे आहेत. त्यामुळेच भगवान श्रीदत्तात्रेयांना 'स्मर्तृगामी' म्हणतात.

(उर्वरीत लेख पुढील अंकी...)

**वसंत गोडबोले**

श्री संत ज्ञानेश्वरांनी सातशे वर्षापूर्वी 'श्रीमद्‌भगवद्‌गीता' या ग्रंथातील गूढ तत्त्वज्ञान, संस्कृत न जाणणाऱ्या सामान्य जनांनाही समजावे अशा पद्धतीने त्याचे विस्तारीत विवरण. त्यावेळी प्रचलित असलेल्या प्राकृत भाषेत आणि तेही ओवीच्या माध्यमाने त्यांच्या 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात केले आहे.

या ग्रंथात प्रत्यक्ष गीतेवर टीका सुरु करण्यापूर्वी मंगलाचरण वजा प्रास्ताविक म्हणून ज्ञानेश्वरांनी ८४ ओव्या खर्ची घातल्या आहेत.

पहिल्या ओवीत त्यांनी अव्यक्त अव्यय आणि अगोचर अशा ब्रह्मतत्त्वाला चार संबोधने वापरुन नमन केले आहे. त्या चार संबोधनांच्या द्वारे त्यांनी सर्व वेदविद्येचे सारच अप्रत्यक्षपणे कथन केले आहे. अशा ब्रह्मतत्त्वाला (परमात्म्याला) प्रथम वंदन करून पुढे ज्ञानोबा अव्यक्त ब्रह्मतत्त्वाचे बीजात्मक चिन्ह जे 'ॐ' त्याचे सगुणात्मक प्रतीक मानल्या गेलेल्या गणपतीचे स्तवन दुसऱ्या ओवीपासून सुरु करतात. २० व्या ओवीने हे स्तवन संपल्यावर २१ व्या ओवीत ते वाग्देवी सरस्वतीला नमन करतात. त्यानंतर २२ व्या ओवीपासून २७ व्या ओवीपर्यंत आपल्या गुरु निवृत्तिनाथांचे स्तवन करून तेच माझ्या माध्यमातून गीतेवर निरुपण करणार आहेत असे सविनय नम्रपणे वाचकांना सांगतात.

गीतेवरील टीका ग्रंथाच्या प्रास्ताविकात गीतेचे महत्त्व सांगणे क्रमप्राप्तच होते. परंतु गीतेचे महत्त्व सांगण्यापूर्वी हे भगवद्‌गीतेचे फळ ज्या वृक्षाला लागले त्या (वृक्षाचा) महाभारत ग्रंथाचा महिमा वर्णन करण्यासाठी २८ ते ४८ ओव्या ज्ञानोबांनी योजिल्या आहेत. प्रस्तुत लेखात ज्ञानोबांनी सांगितलेल्या 'महाभारत' ग्रंथाच्या महिम्याचाच आढावा घ्यावयाचा आहे.

प्रथम ज्ञानदेवांची प्राकृतातील ओवी, नंतर त्या ओवीचे सद्य-भाषेतील अनुष्टुप-श्लोकात भाषांतर व शेवटी भावार्थ सांगणारा गद्यात अनुवाद या क्रमाने ओवी निहाय भावार्थ खाली देत आहे.

**ओवी २८**

आता अवधारा कथा गहन। जे कळाकौतुका जन्मस्थान। की अभिनव उद्यान। विवेकतरुंचे ।।२८।।

**श्लोक –**

महाभारत हे ऐका कथांची खाण जे असे।
विवकरुपी वृक्षांचे जणु उद्यान ते असे।।२८।।

**भावार्थ –**

'महाभारत' हे काव्य म्हणजे जीवन नीतितत्त्वांच्या कथांची जणू खाणच आहे. विवेकरुपी वृक्षांचे हे जणू उद्यानच म्हणता येईल.

**ओवी २९**

ना तरी सर्व सुखाची आदि। जे प्रमेयमहानिधि। नाना नवरससुधाब्धि। परिपूर्ण हे।।२९।।

**श्लोक –**
सांगे जीवनसिद्धांत, सुखाचे मर्म भारत।
साहित्य नवरसांचे हे, जणु 'भारत' सागर ।।२९।।

**भावार्थ –**

त्यांतील कथा निरनिराळे जीवनसिद्धांत आणि सुखाचे मर्मच विशद करून सांगतात. हे महाभारत म्हणजे साहित्य नऊरसांच्या नद्या ज्याला मिळतात असा जणु महासागरच आहे.

**ओवी ३०**
की परमधाम प्रकट। सर्व विद्यांचे मूठपीठ।
शास्त्रजातां वसोट। अशेषांचे।।३०।।

**श्लोक –**
महाभारत विद्यांचे मूळपीठ जणू असे।
निवासस्थान शास्त्रांचे अंतर परमधाम ते।।३०।।

**भावार्थ –**

हे महाभारत सर्व विद्यांचे मूळपीठ असून सर्व शास्त्रांचे अंतिम परमधामच आहे.

**ओवी ३१**
ना तरी सकळ धर्मांचे माहेर। सज्जनांचे जिव्हार। लावण्यरत्नभांडार। शारदेचे।।।३१।।

**श्लोक –**
सर्व कर्तव्य धर्मांचे माहेरघर भारत।
सज्जनां प्रिय अत्यंत साहित्यरत्न-आगर।।३१।।

**भावार्थ –**

ही महाभारत कथा म्हणजे विविध कर्तव्य-धर्मांचे माहेरघरच म्हणावे लागेल. सज्जनांना प्रिय अशा साहित्य रत्नांचा हा जणु खजिनाच आहे.

**ओवी ३२**
नाना कथारुपें भारती। प्रकटली असे त्रिजगतीं।
अविष्कारोनि महामती। व्यासाचिये ।।३२।।

**श्लोक –**
स्फुरता मति व्यासांची नीतीच्या सांगता कथा।
वाग्देवीच जणु भासे प्रकटे भुवनीच या ।।३२।।

**भावार्थ –**

अशा नीतीच्या कथा सांगताना स्फुरलेली व्यासांची मती (प्रज्ञा) म्हणजे साक्षात् वाग्देवीच या भूमीवर अवतरली असावी असे भासते.

**ओवी ३३**
म्हणोनि हा काव्यांरावो। ग्रंथ गुरुवतीचा ठाळो।
एथोनि रसा झाला आवो। रसाळपणाचा।।३३।।

**श्लोक –**
महाकाव्यांचि ही राशी ग्रंथ गौरव आगर।
मिळे नऊ रसांनाही रसाळपण ते इथ।।३३।।

**भावार्थ**

महाभारत म्हणजे महाकाव्यांची जणू सम्राज्ञीच शोभते. ग्रंथ गौरवाचा आगर असा हा ग्रंथ गुरुपदालाच योग्य आहे. या ग्रंथापासूनच नऊ साहित्य-रसांना रसत्य प्राप्त झाले असावे असे वाटते.

**ओवी ३४**
तेवीचि आइका आणीक एक। एथोनि शब्दश्री सशास्त्रिक। आणि महाबोधी कोवळीक। दुणावली।।३४।।

**श्लोक –**
शास्त्रशुद्धचि झाले ते शब्दवैभव ही इथे।

दुणावली सुगमता, आत्मबोधाचि ही इथे।।३४।।

**भावार्थ –**

या भारतात शब्दांना शास्त्रशुद्ध अर्थ लाभल्यामुळेच खरे शब्दवैभव प्राप्त झाले आहे. आत्मबोधाचा अनुभव जो शब्दातीत आहे. तोही येथे शब्दांनी सुगम केला गेला आहे.

**ओवी ३५**

एथ चातुर्य शाहणे झाले। प्रेम रुचीस आले।
आणि सौभाग्य पोखलें। सुखाचे एथ।।३५।।

**श्लोक –**

शहाणे होइ चातुर्य भक्तिरसही तो इथे।
लाभे माधुर्य, सौभाग्य सुखाला लाभते इथे।।३५।।

**भावार्थ –**

येथे चातुर्याला शहाणपण, भक्तिरसाला विशेष माधुर्य, आणि सुखालाच जणू सौभाग्य प्राप्त झाल्याचे भासते.

**ओवी ३६**

माधुर्या मधुरता। शृंगारी सुरेखता।
रुढपण उचिता। दिसे भलें।।३६।।

**भावार्थ –**

येथे माधुर्यालाच विशेष गोडी, शृंगारालाच विशेष सौंदर्य लाभले असून यांतील कथा धर्मनीतीची गुह्य तत्त्वेच विशद करून सांगतात.

**ओवी ३७**

एथ कलाविक्षण कळा। पुण्यासि प्रतापु आगळा।
म्हणऊनि जनमेजयाचे अवलीळा। दोष हरले।।३७।।

**श्लोक –**

लाभे कलांस विज्ञान येथे पुण्यास वैभव।
झाले जनमेजयाचे या कथेने पापक्षालन।।३७।।

**भावार्थ –**

यातील कथांमध्ये कलांनाच विज्ञान, तर पुण्यालाच वैभव प्राप्त झाले आहे. त्यामुळे या कथा ऐकून जनमेजयाच्या सर्पसत्रांतील हिंसेच्या पापांचे पूर्णपणे क्षालन झाले.

**ओवी ३८**

आणि पाहतां नावेक। रंगीसुरंगतेची आगळीक।
गुणां सगुणांचे बिक। बहुवस एथें।।३८।।

**श्लोक –**

विचार करता वाटे, रंग होती सुरंगित।
सद्‌गुणांचेच श्रेष्ठत्व येथे होई प्रकाशित।।३८।।

**भावार्थ –**

यांतील कथा सद्‌गुणांचेच श्रेष्ठत्व सिद्ध करतात. येथे प्रत्यक्ष रंगांनाच सुरंगत्व प्राप्त झाल्याचे भासते.

**ओवी ३९**

भानुचेनि तेजें धवळले। जैसे त्रैलोक्य दिसे उजळिले। तैसे व्यासमती कवळिले। गिरवे विश्व।।३९।।

**श्लोक –**

उजळे जग हे सारे तेजाने रविच्या जसे।
व्यासांच्या प्रतिभे तैसे हे वाग्-विश्व प्रकाशले।।३९।।

**भावार्थ –**

सूर्याच्या तेजाने सर्व विश्व जसे उजळून निघते. त्याचप्रमाणे व्यासांच्या प्रतिभेने सर्व

वाग्-विश्वच उजळून गेले आहे असे भासते.

**ओवी ४०**

का सुक्षेत्रीं बीज घातले। तें आपुलियानरी विस्तारलें। तैसे भारतीं सुरवाडलें। अर्थ जात।।४०।।

**श्लोक –**

जैसे सुपीक भूमीत पेरले बीज विस्तरे। भारतीं तेवि शब्दांना सर्वार्थ फळ लाभले।।४०।।

सर्वार्थ – वाच्यार्थ, लाक्षणिक अर्थ, गूढार्थ इत्यादी (सर्व)

**भावार्थ –**

ज्याप्रमाणे सुपीक जमिनीत पडलेले बी रुजून त्याचा वृक्ष होतो व त्याला फळे लागतात. त्याप्रमाणे महाभारतातील शब्दांना, ते अशा युक्तीने योग्य स्थळी योग्य रीतीने योजले असल्यामुळे कोंब फुटून त्यांना सर्वार्थाची (वाच्यार्थ लाक्षणिक अर्थ, गूढार्थ इ.) फळे धरल्याचा अनुभव येतो.

**ओवी ४१**

न तरी नगरांतरीं वसिजे। तरी नगरचि होइजे। तैसे व्यासोक्तितेजें। धवळत सकळ।।४१।।

**श्लोक –**

नगरीं वसता जैसे जनांना येइ सभ्यता। व्यासोक्तीने तसा लोक सूज निःशंक जाहला।।४१।।

**ओवी ४२**

कीं प्रथमवयसाकाळीं। लावण्याची नव्हाळी। प्रकटे जैसी आगळी। अंगनाअंगीं।।४२।।

**श्लोक –**

नवयौवनची जैसे होता नारीस प्राप्त ते। नारीच्या अंग-अंगात भासे सुंदरता फुले।।४२।।

**ओवी ४३**

ना तरी उद्यानीं माधवी घडे। तेथ वनशोभेची खाणी उघडे। आदिलापासोनि अपाडे। जियापरी।।४३।।

**श्लोक –**

किंवा वसंत येताची वनश्री रुप पालटे। नवपल्लव पुष्पांनी मोहवी ती जगा जसे।।४३।।

**ओवी ४४**

नान धनीभूत सुवर्ण। जैसे न्याहाळीता साधारण। मग अलंकारी बरवेपण। निवाडु दावी।।४४।।

**भावार्थ – ओव्या ४१ ते ४४ (सलग)**

मोठ्या शहरात राहिल्यामुळे माणूस ज्याप्रमाणे सुसंस्कृत व शहाणा होतो किंवा नवतारुण्य प्राप्त झाल्यावर (प्राप्रे षोडशे वर्षे) स्त्रीचे रुप जसे टवटवीत व आकर्षक बनते, किंवा वसंताचे आगमन होताच वनश्री ज्याप्रमाणे नवपल्लव पुष्पांनी मोहरुन जाते वा सोन्याच्या लगडीचा अलंकार बनविल्यावर त्याच सोन्याला जशी चकाकी येते, त्याचप्रमाणे हे व्यासोक्त महाभारत वाचल्याने मनुष्य सूज्ञ होऊन जीवन जगण्याची कला प्राप्त करून घेतो. (४१ ते ४४)

**ओवी ४५**

तैसे व्यासोक्ती अलंकारिले। आवडते बरवेपण पातले। ते जाणोनि काय आश्रयिले। इतिहासीं।।४५।।

**श्लोक –**

व्यासोक्तीच्या अलंकारें खुले सौंदर्य, जाणून।
इतिहास कथा घेती भारताचाच आश्रय।।४५।।

**ओवी ४६**

नाना पुरतिये प्रतिष्ठेलागीं। सानीव धरूनि अंगीं।
पुराणे आख्यानरुपें जगीं। भारता आली।।४६।।

**श्लोक –**

महत्त्व हेतुने सारी पुराणे याच कारणीं।
लघु–आख्यान रुपाने घेती शरण भारतीं।।४६।।

**भावार्थ – ४५ व ४६**

व्यासांच्या प्रतिभेमुळे व शब्दप्रभुत्वामुळे कथेचे सौंदर्य खुलते व त्यात दडलेल्या जीवन तत्त्वांचे प्रकरण होते हे जाणूनच निरनिराळ्या इतिहास कथांनी व पुराणांनी लघु–आख्यान रूपाने या महाभारताचा आश्रय घेतला आहे, असे वाटते.

**ओवी ४७**

म्हणऊनि महाभारतीं नाहीं। ते नोहेचि लोकीं तिहीं। येणे कारणे म्हणिपे पाहीं। व्यासोच्छिष्ट जगन्नय।।४७।।

**श्लोक –**

म्हणूनि भारतीं नाही ते त्रिलोकींही ना मिळे।
'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं' अशी 'म्हण' तरी असे।।४७।।

**भावार्थ –**

म्हणून भारतात नाही असा आशय त्रिलोकांत कुठेच मिळणार नाही. मिळत नाही आणि म्हणूनच 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं' अशी म्हण रुढ झाली आहे.

**ओवी ४८**

ऐसी जगीं सुरस कथा। जे जन्मभूमि परमार्था।
मुनि सांगे नृपनाथा। जनमेजया।।४८।।

**श्लोक –**

जननी परमार्थाची अशी ही भारती कथा।
वैशंपायन कथिती, राजा, जन्मेजयास त्या।।४८।।

**भावार्थ –**

परमार्थाची जणू जननीच अशी ही भारती–कथा (महाभारत) वैशंपायन ऋषींनी जन्मेयस राजास प्रथम कथन केली. (४८) महाभारताचा असा महिमा वर्णन केल्यावर ज्ञानोबा महाभारतात सामावलेल्या भगवद्गीतेसारख्या अद्भूत ग्रंथाबद्दल काय म्हणतात पहा.

आता भारतकमळ परागु। गीतारव्यु प्रसंगु।
जो संवादला श्रीरंगु। अर्जुनेसी।।५०।।

**श्लोक –**

महाभारत पद्मात मकरंद जणू अशी।
भगवद्गीताची कृष्णाने कथिली अर्जुनास जी।।५०।।

महाभारताला नुकत्याच फुललेल्या कमळाची उपमा दिली तर गीतेला त्याकमळातील मकरंद म्हणावे लागेल. ज्ञानोबा पुढे म्हणतात –

सर्व वेदांत मंथूनी व्यासांच्या तीव्र बुद्धिने।
नवनीत जणू गीता–रुपें अद्भुत काढिले।।५१।।

नवनीत ठेवुनी हेची ज्ञानाच्या शेगडीवर।
विवेक–आचें कढले खमंग तूप साजूक।।५२।।

भगवद्गीता म्हणजे सर्व वेदांत तत्त्वज्ञानाचे सार म्हणजेच जणू नवनीत आहे, असे पुष्कळ ठिकाणी म्हटले जाते. पण ज्ञानोबा

त्याच्याही पुढे जाऊन म्हणतात, की ते लोणी (नवनीत) जे टिकाऊ नसते) व्यासांनी ज्ञानाच्या शेगडीवर त्याला विवेकाची आच देऊन त्याचे (टिकाऊ) जे खमंग साजूक तूप तयार केले ती म्हणजेच भगवद्गीता!

वेद-विद्येतील ज्ञानकांडातील आशय निरनिराळ्या उपनिषदांनी त्यांतील निरनिराळ्या पैलूंवर भाष्य केले आहे. ही उपनिषदे निरनिराळ्या ऋषींनी निरनिराळ्या काळात रचली असल्यामुळे आणि त्यांत विविध बाबींवर विशेष जोर दिला गेला असल्यामुळे, सामान्य माणसाला त्याच्यात बरेच ठिकाणी विरोधाभास असल्यासारखे वाटू शकते. यासर्व उपनिषदांचा समन्वय साधून व त्याला कषिलांच्या सांख्यशास्त्राचीही जोड देऊन वेद-विद्या (वेदांत-तत्त्वज्ञान) 'असंशय' व 'समग्र' रीतीने भगवद्गीतेंत व्यासांनी कथन केली आहे. भगवद्गीतेत सांगितलेले तत्त्वज्ञान व नीतीनियम लोकांना व्यावहारिक दृष्ट्या समजावून सांगण्याच्या उद्देशानेच महाभारतात निरनिराळ्या कथांची योजना केली आहे. या कथांत वर्णिलेले व्यक्तिविशेष म्हणजे वैदिक तत्त्वज्ञानाच्या संदर्भात दाखविलेली प्रात्यक्षिक उदाहरणेच होत.

'सत्य' अहिंसा इत्यादी मूल नियमांना परिस्थितीनुरुप कसे अपवाद करावे लागतात हेही या कथांमधून दाखवून दिले आहे. दातृत्व हा मोठा गुण खराच. पण त्याचाही अतिरेक झाल्यास काय परिणाम होऊ शकतो हे कर्णाच्या व्यक्तिमत्वातून महाभारतात दाखविले आहे. जीव गेला तरी (दिलेला शब्द) केलेली प्रतिज्ञा मोडू नये हा क्षत्रिय धर्म सांगितला आहे. मी (भारतीय युद्धात) शस्त्र हाती घेणार नाही अशी प्रतिज्ञा कृष्णाने केली होती. पण ज्यावेळी भीष्मांच्या शस्त्र माऱ्यापुढे अर्जुनाचा टिकाव लागत नाही व त्याच्या जिवाला धोका होण्याची परिस्थती निर्माण होते त्यावेळी प्रत्यक्ष भगवान कृष्णच आपल्या प्रतिज्ञेतून पळवाट काढण्यासाठी रथाचे चाक काढून त्यात सुदर्शन चक्राची योजना करून भीष्माच्या अंगावर धावून जातात व अर्जुनाचे रक्षण करतात. 'भवंता तुला तुझी प्रतिज्ञा मोडावयास लावली. मी कृतार्थ झालो' असे उद्गार भीष्मांच्या तोंडी महाभारतात घातले आहेत. प्रत्यक्ष भगवंताची ही कृती बरेच काही सांगून जाते. म्हणून त्याच व्यासांनी विष्णूसहस्त्रनामांत 'रथांगपाणि' (रथांगपाणी-रथाचे अंग जे चाक ते हातात घेणारा) असे विष्णूचे नाम घालून कृष्णाच्या प्रतिज्ञाभंगाचे समर्थनच केले आहे.

भगवद्गीता हे 'जीवनाचे शास्त्र' आहे व त्या शास्त्रांतील नियम, व्यावहारिक प्रात्यक्षिक उदाहरणे देऊन समजावून सांगणाऱ्या कथांचे महाभारत जणू आगरच आहे.

म्हणूनच महाभारत जीवनाचे शास्त्र समजावून सांगणारे 'वीररसयुक्त महाकाव्य' म्हणून सर्व जगात प्रसिद्ध आहे.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

# कौटिल्यीय अर्थशास्त्र (राजाचे शिक्षण)

डॉ. वैशाली जयंत दाबके

राजाच्या शिक्षणप्रक्रियेतील अनिवार्य मानलेल्या आन्वीक्षिकी त्रयी, वार्ता, दण्डनीती या चार विद्या, त्यांतील उपविषय, प्रत्यक्ष राज्यकारभारातील महत्त्व या विषयांचे कौटिल्याने केलेले सविस्तर विवेचन मागील लेखांकात पाहिले. या विद्या, राजाच्या औपचारिक शिक्षणात मोडतात. ह्या औपचारिक शिक्षणाचा प्रारंभ उपनयन संस्कारानंतर गुरुकुलात पाठविल्यावर होत असे. या औपचारिक शिक्षणप्रक्रियेचे आदर्श दैनिक वेळापत्रक ही कौटिल्याने संक्षेपाने वर्णन केले आहे.

या वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांनी दिवसाच्या पहिल्या भागात हत्ती, घोडे, रथ, शस्त्रे यांच्याविषयीच्या विद्यांचा अभ्यास करावा. त्रयी, वार्ता इ. मुख्य विषयाशी या अभ्यास शास्त्रांचा साक्षात् संबंध नाही. परंतु राजाला हस्तिशास्त्र, अश्वशास्त्र, सारथ्यविद्या आणि शस्त्रविद्या शिकणे अत्यावश्यक होते. प्रजारक्षण हे राजाचे आद्यकर्तव्य होते. प्रजारक्षणासाठी युविद्या व त्याच्याशी निगडीत अशा या शाखांचे ज्ञान अनिवार्य होते. चतुरंग दळातील पायदळ, घोडदळ, हत्तीदळ आणि रथ यांना अनुसरुन या चार अभ्यास शाखांचा राजाच्या शिक्षणात अंतर्भाव केला असावा असे दिसते. प्रत्यक्ष युद्धात या विद्यांचा उपयोग होत असे. हस्तिशास्त्र, अश्वायुर्वेद विषयक ग्रंथ त्या काळात उपलब्ध असावेत. अर्थशास्त्रातही गजाध्यक्ष आणि अध्यक्ष यांची कर्तव्ये सांगताना या विषयावर बरीच माहिती दिलेली आहे. या विद्यांच्या संदर्भात ग्रांथिक आणि प्रात्यक्षिक या दोन्ही प्रकारचे शिक्षण दिले जात असावे. आजच्या परिभाषेत सांगायचे तर या उपयोजित विद्या (Applied Science) होत्या. या विद्यांच्या अध्ययनात शारीरिक शिक्षण आणि सराव अपेक्षित असल्याने दिवसाच्या पूर्वभागात या विद्यांचे अध्ययन करावे असे म्हटले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे सकाळच्या प्रहरात मनुष्य शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या अधिक सक्षम असतो आणि त्याची ग्रहणक्षमताही अधिक असते.

दिवसाच्या उत्तरभागात इतिहासविषयाचे अध्ययन करावे असे म्हटले आहे. इतिहासविषयात पुराणे, बखरी, आख्यायिका, दाखलेवजा गोष्टी, धर्मशास्त्र आणि अर्थशास्त्र या विषयांचा समावेश आहे. इतिहासात समाविष्ट केलेल्या या विषयांवरून इतिहासाच्या अध्ययनाची व्याप्ती लक्षात येते. या विषयांपैकी पुराणग्रंथात विविध वंश, त्या त्या वंशातील राजांची चरित्रे, सृष्टिनिर्मिती, सृष्टिप्रलाय, कालगणना इ. विविध विषय वर्णिलेले असतात. बखरी म्हणजे युद्धादी घटनांचे इतिवृत्तांत आख्यायिका म्हणजे पुराकथा. धर्मशास्त्रात वर्णाश्रमकर्तव्ये, संस्कार तसेच समाजोपयोगी सर्वसाधारण नियम, विशिष्ट गटांसाठी विशेष नियम, अर्थात कायदे कर्तव्ये इ. विषयांचा अंतर्भाव असतो. या विषयांपैकी पुराणे, बखरी, आख्यायिका हे विषय भूतकाळात घडून गेलेल्या घटनांशी

निगडीत आहेत. या विषयांच्या अध्ययनातून राजाला कर्तव्याकर्तव्याविषयी मार्गदर्शन मिळते. धर्मशास्त्र आणि अर्थशास्त्राचा राजाला प्रत्यक्ष राज्यकारभारात उपयोग होतो. समाजधारणा, राज्याचे यथायोग्य पालन या शास्त्रांच्या अभ्यासाने साध्य होते.

दिवसाच्या उर्वरित प्रहरांत विद्यार्थ्यांनी इतर नवीन विषयांचे ग्रहण करावे. जे ग्रहण केले आहे त्याचा अभ्यास म्हणजे उजळणी करावी. जे विषय ग्रहण झालेले नाहीत त्यांचे पुनःपुन्हा श्रवण करावे असे सांगितले आहे. श्रवण, ग्रहण, धारण, मनन, उपयोजन या क्रमाने प्राप्त केलेल्या ज्ञानाचे आणि अविरत अध्ययनाचे लाभ सांगताना कौटिल्य म्हणतो. अध्ययनाने बुद्धी परिपक्व होते. बुद्धी परिपक्व झाली की कार्यक्षमता वाढते. कार्यसक्षम व्यक्तीचा आत्मप्रत्यय म्हणजे आत्मविश्वास वाढीला लागतो. आत्मविश्वासाने केलेली कामे सफल होतात आणि अधिकाधिक फल देतात. यथायोग्य ज्ञानप्राप्तीमुळे आपोआपच विनयादी गुणांची वृद्धी होते. रागलोभादी दुर्गुणांचा त्याग केला जातो. सुशिक्षित आणि सर्वगुण संपन्न, विद्येचे महत्त्व जाणणारा राजा, प्रजाजनांनाही ज्ञानसंपन्न करण्यास तत्पर असतो. त्यांच्या कल्याणासाठी दक्ष असतो. 'शहाणे करून सोडावे सकल प्रजाजन' हे शब्द सार्थ करतो.

हे औपचारिक अध्ययन केल्यानंतरही प्रत्यक्ष राज्यकारभार सांभाळताना राजाने वृद्धांच्या सहवासात नित्य असावे असे म्हटले आहे. हे वृद्ध म्हणजे अर्थातच ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध अनुभवसंपन्न व्यक्ती, वार्ता, दण्डनीतीशी संबंधित विद्याही राजाने त्या त्या अध्यक्षांकडून, म्हणजे या विद्यांचा प्रत्यक्ष उपयोग प्रयोग करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून शिकून घ्याव्या असे म्हटले आहे. थोडक्यात अध्ययन ही राजासाठी तसेच इतर कुणाहीसाठी अखंड, अविरत चालणारी प्रक्रिया आहे असेच कौटिल्य सुचवितो.

कौटिल्याचे शिक्षणविषयक विचार प्रामुख्याने राजा, राज्यकारभार या विषयांना अनुसरुन व्यक्त झाले आहेत. राजाला मार्गदर्शन करणे हा या ग्रंथाचा मुख्य उद्देश असल्याने राजाने शिकायच्या विद्या, वेळापत्रक त्याने दिले आहे. परंतु इतर वर्णांनी कोणत्या विद्या शिकाव्या इ. विषयी विवेचन केलेले नाही. वेळापत्रकही संक्षेपाने ढोबळ स्वरुपात दिले आहे. तपशीलवार वेळापत्रक स्थळ काळ परिस्थितीनुसार त्या त्या गुरुने ठरवावे अशी अपेक्षा दिसते. वेळेचे आणि अध्ययन विषयांचे योग्य नियोजन हवे हे निश्चितच यातून सुचविले आहे. या शिक्षणपद्धतीत ग्रांथिक आणि प्रात्यक्षिक अध्ययनाने संतुलन तर साधले आहे. एवढेच नाही तर त्याबरोबरच छात्रांना स्व-अभ्यास, स्वतंत्र अभ्यास आणि चिंतन करण्यासही पुरेसे महत्त्व आणि वेळही दिलेला आहे. ही विशेष लक्षणीय बाब आहे. अर्थशास्त्रात 'राजाचे शिक्षण' या विषयाव्यतिरिक्त इतरही शिक्षणविषयक विचार अल्पांशाने प्रकट झाले आहेत. त्यांचा आढावा पुढील लेखात घेऊ.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ नगर,
तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

●●●

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

बाबांच्या या सगळ्या लीलांना देशातल्या सगळ्या राजकीय पक्षांचा पाठींबा बघून दुःखापेक्षा चीड जास्त येते. राजाश्रयाखाली चाललेली ही विदुषकगिरी, मर्कटलीला, भोंदुगिरी आपल्या समाजाचे काय चित्र आपल्यासमोर उभे करते? हाच का आपला धर्म आणि अध्यात्म? एक दोन नाहीत तर, डझनभर असे बाबा, गुरु आणि संतांच्या 'अध्यात्मिक' लिलांमधील 'फसवेगिरी' आणि 'भोंदुपणा' उघडकीस आला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सगळ्या भोंदुंना कुठल्या ना कुठल्या प्रकारांनी राजाश्रय मिळत होता. या सगळ्या घटनांची चर्चा होते, त्यावर टिका होते पण या भोंदूंचे आश्रम आजही श्रद्धाळूंनी भरून वाहताना दिसतात. महाराष्ट्रात तर आपल्या सगळ्या उत्सवांचे झालेले बकालीकरण आणि राजकारण्यांनी, 'परंपरा' आणि 'संस्कृती'च्या नावाखाली घेतलेला त्यांचा ताबा, उद्वेगजनक आहे.

'अध्यात्म', 'धर्म' आणि 'श्रद्धा' या सगळ्यांवरतीच आज एक मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अध्यात्म हे थोतांड आहे, श्रद्धा ही अंधच असते, धर्म ही अफूची गोळी आहे, या सगळ्या सिद्धांतांना यामुळे पुष्टीच मिळत आहे. या सगळ्यांच्या बाबतीत डोक्यावरुन पाणी केव्हाच वाहून गेले आहे. याला जबाबदार कोण हाच प्रश्न आहे.

ज्या संस्कृतीने जगासमोर 'अध्यात्म', 'धर्म' या सगळ्यांच्या संदर्भात एक वेगळा सनातन विचार मांडला, त्याच संस्कृतींचे पाईक असल्याचा दावा करणाऱ्यांनी त्याचा चालवलेला धंदा, क्लेशकारकच नाही तर अक्षम्य आहे. भोंदूपेक्षा त्यांच्या भोंदूगिरीला सामाजिक प्रतिष्ठा देऊन त्याचा फायदा उठवणारे हे सामाजिक, सांस्कृतिक, आणि राजकीय नेतृत्व याकरता जास्त गुन्हेगार आहे. अर्थातच, आपली 'सारासार' विवेक बुद्धी गहाण ठेवून या भोंदूबाबांच्या मागे लागलेले श्रद्धाळूही त्याकरता तेवढेच गुन्हेगार ठरतात. इतक्या हास्यास्पद विदुषकी भोंदूबाबांच्या पुढे आपण नतमस्तक होणार असू तर, त्याचा दोष भोंदूबाबांपेक्षा आपल्या वैचारिक दिवाळखोरीला जास्त द्यायला हवा.

हिंदु धर्म व्यवस्थेचं स्वरुप याकरता समजावून घेणं आवश्यक आहे.

जगातल्या इतर सगळ्या प्राचीन, आणि नंतर आलेल्या अशा धर्मव्यवस्थेपेक्षा ते स्वरूप नुसतेच वेगळे नाही तर, मुलभूतदृष्ट्या ते भिन्न आहे. अशा सगळ्या धर्म व्यवस्थांमध्ये त्यांचा एक 'प्रेषित' असतो; आणि एक 'धर्मग्रंथ' असतो. त्या धर्मग्रंथातील 'वचन' किंवा 'विचार' हे अपरिवर्तनीय असतात. त्या व्यवस्थेच्या अनुयायांना, आणि त्यांच्या जीवन व्यवहाराला त्या परिघातच रहावे लागते. अन्यथा ती व्यक्ती व्यवस्थेबाहेर ढकलली जाते. ख्रिस्ती धर्माचा प्रेषित 'येशू ख्रिस्त' आहे, तर त्याचा धर्मग्रंथ 'बायबल' आहे. इस्लामचा प्रेषित 'महम्मद' आहे, तर त्यांचा धर्मग्रंथ 'कुराण' आहे. झोरेस्ट्रीयन, आणि ज्यू या सगळ्यांनाही त्यांचे प्रेषित आहेत आणि धर्मग्रंथही आहेत.

हिंदूंना कोणीही प्रेषित नाही, किंवा त्यांचा एक धर्मग्रंथ नाही. हिंदूंच्या धर्मग्रंथाची रचना ही सर्वतः भिन्न आहे. काळाच्या ओघात हिंदू धर्मामध्येही अनेक देवदेवता झाल्या. त्यांची स्तोत्रे झाली. त्यांच्या पूजा-अर्चाकरता कर्मकांडेही चालू झाली. तरीही कुठल्या व्यक्तींनी कुठल्या देवाची पूजा करायची याचे त्याला संपूर्ण स्वातंत्र्य असते. एवढेच काय पण अशाप्रकारे देवांचे अस्तित्व नाकरणाऱ्यांनाही या व्यवस्थेमध्ये स्थान आहे. या सगळ्या इतिहासाचा उहापोह इथे करणं अशक्य आहे. हिंदु धर्माची ओळख ही त्यांच्या 'देवदेवतां'पेक्षा त्यांचे 'वैचारिक' ग्रंथ आणि समाजरचनेवर आधारित आहे.

मी कोण? मी कुठून आलो? आणि माझा या चराचराशी काय संबंध? याची चर्चा उपनिषदांमध्ये आढळते. हिंदूंची षट्‌दर्शनें ही याच विचार प्रक्रियेचा भाग आहे. त्यांचा सर्वात मोठा श्रद्धेचा ग्रंथ 'भगवद्‌गीता' हा सुद्धा सर्वसामान्य माणसाला जगण्याकरता लागणाऱ्या 'अध्यात्मिक', आणि 'ऐहिक' दोन्ही विचारांचे संतुलित मार्गदर्शन करतो. 'पुर्नजन्म' आणि 'कर्मसिद्धान्त' हे ही या व्यवस्थेचे महत्वाचे आधार आहेत, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे हे सर्व ज्यांच्याकरता आहे, त्यांच्या समाज व्यवस्थेची रचना म्हणजे 'वर्णाश्रमधर्म', हाही त्याचाच भाग आहे.

वर्णाश्रमधर्मांचा विचार हा कुठल्याही जन्माला आलेल्या व्यक्तीची नैसर्गिक स्थित्यंतर, आणि त्यानुसार त्याला करावी लागणारी कार्य यांच्याशी निगडीत आहे. जीवनाचा इतका सखोल, आणि चिंतनशील विचार आणि त्यानुसार त्याला दिलेली कार्य ही कुठल्याही इतर व्यवस्थेत मिळत नाहीत. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम या क्रमाने ही व्यवस्था आहे. सर्व वर्णांना ती सारखी आहे. समाज म्हणून जेव्हा एखादी व्यवस्था अस्तित्वात येते तेव्हा त्यांच्या गरजांचीही निर्मिती झालेली असते. बहुतांशी या सर्व गरजा या भौतिक गरजा असतात. त्यावरच आधारित हिंदुंची वर्णव्यवस्था आहे. ब्राह्मण ज्ञानग्रहण, आणि वितरणाचे कार्य करतो, क्षत्रिय संरक्षणाचे कार्य करतो, वैश्य व्यापार, अर्थकारण करतो, आणि क्षुद्र या सगळ्या व्यवस्थेमध्ये त्यांना लागणाऱ्या सेवांचे वहन करतो.

भारत ही एक सुवर्णभूमी होती, आणि त्यात सोन्याचा धूर निघत होता, अशीच त्याची ओळख अलेक्झांडरपासून १६ व्या शतकात इस्ट इंडिया कंपनीचे आगमन भारतात झाले तिथपर्यंत होती. या दोन अडीच हजार वर्षाच्या कालावधीमध्ये बौद्धिक, चिंतनशील, वैचारिक ग्रंथांच्या निर्मितीपासून व्यापार, उद्योग, वस्त्रनिर्मिती, शिल्प, नाट्य, साहित्य, चित्रकला, व्यापाराकरता लागणारे नौकानयन, भाषा, वैद्यक अशा जीवनाकरता आवश्यक असणाऱ्या सर्व क्षेत्रांमध्ये विकास, आणि शेकड्यांनी नाही तर हजारोंनी मार्गदर्शक ग्रंथांची निर्मिती त्या त्या क्षेत्रात करण्यात आली. साम्य-समाजवादी आणि नंतर वर्गकलहाच्या पिशाच्यानी झपाटलेल्या इतिहासकारांच्या सांगण्याप्रमाणे २५०० वर्ष

या देशांमध्ये जर फक्त 'वर्गकलह' चालू असेल, तर वर सांगितलेल्या गोष्टींची निर्मिती होणे शक्य आहे कां? वर्णाश्रमधर्म हा या सगळ्या व्यवस्थेची ऊर्जा होती. कमीत कमी २५०० वर्ष तरी त्यामध्ये संतुलन होते.

शून्य, आणि आकड्यांची निर्मिती भारतात झाली हे सर्वश्रुत आहे. ते युरोपमध्ये पोचायला तेरावे शतक उजाडायला लागले. १२०२ मध्ये फिबोनाची (Fibonacci) या इटालियन अभ्यासकांनी Liber abacci या आपल्या ग्रंथामधून या आकड्यांची ओळख युरोपला करून दिली. त्याला या आकड्यांची माहिती पूर्व आफ्रिकेमधील अल्जेरिया या देशामध्ये, बुजिया (Bugia) या बंदरामध्ये शिकत असतांना मिळाली. या बंदरामध्ये भारतीय व्यापाऱ्यांची ये-जा होत होती, आणि आपल्या व्यवहारामध्ये ते ह्या आकड्यांचा वापर करत होते. म्हणजे हे आकडे युरोपमध्ये, आर्यभट किंवा तत्सम गणिताच्या पंडीती ग्रंथांनी पोचले नसून, ते व्यापाराच्या माध्यमातून तेथे पोचले. 'दमास्कस' पोलाद म्हणून प्रसिद्ध असलेल्या पोलाद निर्मितीचे तंत्रज्ञान काय किंवा, इजिप्तमध्ये उत्खननात सापडलेली भारतीय वस्त्र काय, ही जगभर पंडीती ग्रंथांपेक्षा व्यापारानी पोचवली. वर्णाश्रम व्यवस्थेमध्ये, त्यांच्या कार्यक्षेत्राच्या वितरणातील संतुलनाशिवाय या गोष्टी शक्य आहेत कां? ब्राह्मण, वैश्य, क्षुद्र या सगळ्या वर्णांचा अशा निर्मितीमध्ये सहभाग असल्याशिवाय त्याचा व्यापार होणे शक्य आहे काय? थोडक्यात, वर्णाश्रम धर्म समस्त समाजाच्या 'ऐहिक' आणि 'अध्यात्मिक' उन्नतीला कारणीभूत होत होता.

या ऐहिक वस्तूंच्या व्यापाराप्रमाणेच, आणखीन एक गोष्ट भारताने जगाला दिली, आणि ती म्हणजे 'योग'. अलेक्झांडरच्या काळापासून ते २० व्या शतकातील विज्ञानाच्या शिखरावर पोचलेल्या अमेरिकेपर्यंत त्याचा प्रभाव आज तसूभरही कमी झालेला नाही.

५ व्या शतकातील रोमन साम्राज्याच्या अस्तापासून, १५ व्या शतकातील प्रबोधनयुगाच्या (Renaissance) उदयापर्यंतचा हजार वर्षांचा काळ हा युरोपच्या इतिहासामध्ये 'अंधारयुग' म्हणून ओळखला जातो. प्रबोधन युगामुळे ख्रिस्तीधर्म सत्तेचा प्रभाव कमी व्हायला लागला आणि युरोपमध्ये विज्ञानक्रांतीला सुरुवात झाली. यातूनच पुढे औद्योगिक क्रांती झाली, आणि 'समाजरचना' आणि त्यांची 'कार्ये' ही या औद्योगिक क्रांतीला सुसंगत होऊ लागली. परंपरागत ग्रीक किंवा रोमन व्यवस्थेपेक्षा ती भिन्न होती. यातूनच इंग्रजांचा वसाहतवाद निर्माण झाला, आणि १६ व्या शतकानंतर भारत हा इंग्रजांची वसाहत झाला. याची सुरवात अर्थातच व्यापार हीच होती.

१६ व्या शतकामध्ये जगातील व्यापार, आणि अर्थकारणामध्ये भारताचा हिस्सा हा २३% टक्के होता. तर १९४७ साली इंग्रज जेव्हा हा देश सोडून गेले तेव्हा त्याचे प्रमाण ४% पेक्षाही खाली आले होते. म्हणजे या तीन साडेतीनशे वर्षांत येथील कुटीरउद्योग, त्यावर आधारलेले उद्योगधंदे हे सर्व नष्ट झाले होते. ती पोकळी पाश्चात्य देशांतून

औद्योगिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या वस्तू भरून काढत होत्या. ब्रिटीश सत्तेमुळे भारताचे झालेले आर्थिक शोषण आणि त्यामुळे झालेली त्याची आर्थिक दिवाळखोरीची कारणमीमांसा, दादाभाई नौरोजींनी १८७६ साली लिहिलेल्या 'Poverty and Un-British Rule in India' या पुस्तकामध्ये सविस्तरपणे मांडली आहे. याच सुमाराला इंग्रजी शिक्षण पद्धती तयार होऊन नवशिक्षितांची पिढीही तयार होत होती. परंपरागत शिक्षण पद्धती यामुळे संपूर्णतयाः नष्ट झाली. याचे व्हायचे तेच सांस्कृतिक, आणि सामाजिक परिणाम आजही आपण भोगत आहोत. आर्थिक दिवाळखोरी बरोबरच येथील वर्णाश्रमावर आधारलेली समाजव्यवस्थाही मोडकळीस यायला लागली. अस्तित्वाकरता असलेला त्याचा पायाच उध्वस्त झाला आणि त्यावर आधारलेले व्यवसायही कोलमडून पडले. सांस्कृतिकदृष्ट्या संपूर्ण 'भिन्न' असलेल्या व्यवसायांशी जुळवून घेण्याची धडपड चालू झाली. हजारो वर्षाच्या अनुभवातून विकसित झालेले 'व्यवसाय' कौशल्ये मातीमोल झाली. 'आश्रम' तेच असले तरी, व्यवस्थेमध्ये त्याचे महत्व नाहीसे होऊन वर्णव्यवस्थाही संदर्भहीन झाली. या धडपडीमध्येच त्यामध्ये अनेक अपप्रवृत्ती, आणि दुर्दैवाने त्यांची पाठराखण चालू झाली.

ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी याच वैगुण्याचा फायदा घेतला. या व्यवस्थेचा लोकांवरचा प्रभाव त्यांच्या धर्मप्रसाराच्या आड येत होता. ख्रिस्तीपंथातील 'Priest', आणि वर्णाश्रमर्धातील 'ब्राह्मण' यांचा दूरान्वयेही संबंध नव्हता. साधर्म्य असलेच तर ते पूजापाठ करणाऱ्या 'पुरोहित' वर्गाशी होते. पुरोहित ब्राह्मण होते पण सगळे ब्राह्मण पुरोहित नव्हते. युरोपमध्ये, या Priest मंडळींनी चर्चच्या माध्यमांतून लोकांची प्रचंड पिळवणूक केली होती. त्यांच्या ताब्यातील लहान मुलांचे लैंगिक शोषण ते आतापर्यंत करत होते. प्रबोधनयुगामध्ये यांचे वर्चस्व झुगारुन, युरोप एका नवीन स्वातंत्र्याचा अनुभव घेत होता.

भारतामध्ये अशी कुठलीही परिस्थिती नव्हती. याउलट सर्व वर्णांचे संबंध परस्परावलंबी, आणि एकमेकांना पूरक होते. 'पोथी'निष्ठ मार्कस्वाद्यांनी, आणि त्यावर आधारीत समाजशास्त्रज्ञांनीही युरोपमधील 'Priest' आणि भारतातील 'ब्राह्मण' वर्ण एकच समजून 'विकृत' इतिहास लिहिला.

याचवेळी धर्मप्रसाराकरता आलेले ख्रिस्ती धर्मप्रसारक, आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी हिंदु संस्कृतीच्या अभ्यासाला सुरुवात केली. १७८५ ला Charles Wilkins यांनी भगवद्गीतेचे पहिले इंग्रजी भाषांतर केले. १७८९ साली विल्यम जोन्स यांनी शाकुंतलचे भाषांतर केले, आणि त्यांनीच केलेले मनुस्मृतीचे भाषांतर त्यांच्या मृत्यूनंतर १७९४ साली प्रकाशित झाले. तेव्हापासून चालू झालेल्या हिंदू संस्कृतीचा 'चिकित्सक' अभ्यास आजपर्यंत पाश्चात्य देशांमध्ये चालू आहे.

औद्योगिकीकरण, आणि वसाहतवादामुळे ऐहिक गरजा भागवता येऊ लागल्या असल्या तरी, मनुष्य अधिक 'आत्मकेंद्रीत' होऊ लागला होता. बंदिस्त

ख्रिस्ती तत्वज्ञान, समाजाला पडणाऱ्या नवीन प्रश्नांना उत्तर देऊ शकत नव्हते. अशाचवेळी हिंदू तत्त्वज्ञान आणि संस्कृतीचे ग्रंथ यूरोपमध्ये त्याला उपलब्ध होऊ लागले. उपनिषद्, आणि दार्शनिक तत्वज्ञानातील चिंतन बघून तो त्या विचारांकडे जास्तीत जास्त आकर्षिला जाऊ लागला. १९ व्या, २०व्या शतकामध्ये जर्मनी आणि अमेरिकेमधील अनेक विचारवंत यामुळे प्रभावित झाले. नवभौतिकेच्या निर्मितीचे वैज्ञानिक नील्स बॉर (Niels Bohr) हायसेनबर्ग (Heisenberg), एर्विन श्रोडिंगर (Erwin Shrodinger) आणि जे. रॉबर्ट ऑपेनहायमर (J. Robert Oppenheimer) या सगळ्यांनी आपल्या लिखाणातून पौर्वात्य 'हिंदू' आणि 'बौद्ध' तत्वज्ञान, विशेषतः उपनिषदांचा त्यांच्या चिंतनावरील प्रभाव प्रामाणिकपणे लिहून ठेवला आहे. अमेरिकेतील विचारवंत राल्फ वाल्डो इमरसन (Ralph Waldo Emerson), हेन्री थोरो (Henry Thoreau) आणि वॉल्ट व्हाइटमन (Walt Whitman) या सगळ्यांनीही पौर्वात्य तत्वज्ञातील, विशेषतः उपनिषद्, दर्शने आणि भगवद्गीतेच्या प्रभावाचे ऋण त्यांच्या लिखाणातून मान्य केले आहे. प्रसिद्ध इतिहासकार टॉयनबी (Arnold Toyenbee) यांनी १९५२ साली धर्म आणि नवीन तंत्रज्ञानावर भाष्य करतांना लिहिले आहे की,

"India, the conquered, will conquer it's conquerors ...... catholic minded Indian religious spirit .... is the way of salvation for all religions in an age in which we have to learn to live as a single family if we are not to distroy ourselves".

१८९३ साली स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथील धर्मसंसदेमध्ये केलेल्या भाषणामुळे, 'योग' आणि 'वेदांत' यांचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास अमेरिकेत होऊ लागला. १९२० साली परमहंस योगानंद यांनी बोस्टन येथील अशाच एका धर्मसंसदेमध्ये भाषण करून या तत्वज्ञानाची पाश्चात्यांची भूक वाढवली. २० व्या शतकाच्या मध्यावर अमेरिकेमध्येही मोठ्या प्रमाणावर भौतिकसुख उपभोगूनही अशांत आणि अतृप्तवर्ग निर्माण होत होता. परंपरागत ख्रिस्ती विचार, किंवा भौतिक अमेरिकन संस्कृतीमध्ये त्यांना पडलेल्या प्रश्नांना उत्तरे मिळत नव्हती. या घुसमटीतून सोडवणूक करण्याकरिता तो अमली पदार्थांचे सेवन करून शांती मिळते कां? हे बघू लागला. याचवेळी पुन्हा एकदा 'योग' आणि 'वेदांत' घेऊन नवीन हिंदू स्वामींनी अमेरिकेवर प्रभाव टाकायला सुरुवात केली. महर्षि महेश योगी, रजनीश, हरे कृष्ण हरे राम, नित्यानंद अशा अनेक स्वामींनी अमेरिकन मनावर भुरळ घातली. यांचे पंचतारांकित आश्रम उभे राहिले.

आज अमेरिकेमध्ये शेकड्यांनी योगाच्या शिक्षण देणाऱ्या संस्था, आणि वेदांत शिकवणारे अभ्यासक्रम विद्यापीठांमधून शिकवले जात आहेत. गुरु, पंडित, मंत्र, योग, ध्यान, कर्म, निर्वाण, मोक्ष, कुंडलिनी इ. शब्द आणि त्यामागचे विचार हे आज इंग्रजी भाषा, आणि अमेरिकन संस्कृतीमध्ये रुजू झाले आहेत. अलीकडेच फिलिप गोल्डबर्ग यानी ''अमेरिकन वेद'' हे पुस्तक

लिहून या सगळ्या गोष्टींची कारण-मीमांसा आणि विवेचन यामध्ये केले आहे. २००९ च्या Newsweek या अमेरिकेतील प्रसिद्ध साप्ताहिकामध्ये लिसा मिलर यानी चक्क "We all are Hindus now". या शिर्षकाखाली लेख लिहून एकच खळबळ माजवली.

आजच्या भोंदूबाबांची पार्श्वभूमी, आणि त्यांना राजकारण्यांचा मिळणारा पाठींबा समजण्याकरता हा इतिहास समजणे आवश्यक आहे. पाश्चात्यांना भुरळ घालणारे तत्त्वज्ञान किंवा वर सांगितलेल्या स्वामीनी अमेरिकेत जे आश्रम स्थापन केले त्याच्या मुळाशी उपनिषद्, योग आणि दार्शनिक सिद्धान्तांची बैठक होती. यातही काहींनी 'भोंदूपणा' आणि 'व्यावसायिकता' आणली असली तरी, मूळ विचार आजही या पाश्चात्य देशांमध्ये गांभीर्यानी स्वीकारला जातोय. याविरुद्ध, भारतामध्ये फोफावलेल्या आजच्या या स्वामींना, मर्कटलिलांवर जास्त भर द्यावा लागत आहे.

अलिकडचा 'योग'दिवस ही साजरा होतो तो पंतप्रधानांपासून, मुख्यमंत्र्यापर्यंत केलेल्या आसनांच्या वर्णनांनी. 'योग' हा एक दर्शनाचा भाग आहे. तो समजल्या शिवाय केवळ आसनं निरुपयोगी आहेत, याकडे लक्ष द्यायला आज कुणीच तयार नाही. हिंदू तत्वज्ञानांतील 'चिंतन' आणि 'वैचारिक' खोली बघून पाश्चिमात्य ज्याकडे आकर्षित झाले ती उपनिषद्‌ही आज आपल्याकडे फारशी वाचली जात नाहीत, ही आपला 'धर्म' आणि 'अध्यात्मा'ची एक शोकांतिका आहे. सर्व क्षेत्रामधील नेतृत्वाच्या दिवाळखोरीचे ते एक जिवंत उदाहरण आहे.

रामरहिम, किंवा आसारामबापू यांना एक वेळ शिक्षा होईल, पण ज्यांच्या जीवावर ते मोठे झाले त्या श्रद्धाळूंनी जर 'तारतम्य' सोडले, तर असले 'विदुषकी' नवीन नवीन बाबा राजकारणांच्या खांद्यावर उभे राहून निर्माण होतच राहतील, आणि धर्म, अध्यात्म आणि संस्कृतीची घसरण चालूच राहील. वर्णाश्रम धर्माचे वास्तव स्वरुप, आणि त्याचे 'समाज' आणि 'संस्कृती' निर्मिती, आणि त्याच्या संरक्षणातले योगदान, 'वस्तूनिष्ठ' आणि 'तटस्थ' संशोधनानी समजावून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे, हजारो वर्षाच्या वर्ग कलहाच्या निराधार थापांनी भरलेला साम्यवादी इतिहास, आणि त्यालाच पोषक ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी केलेले संस्कृतीभंजनाची सामाजशास्त्रीय झापडे दूर करणे हेही तेवढेच महत्वाचे आहे.

'भोंदू'बाबा आणि 'जातीय'वादापासून या समाजाला आणि अध्यात्माला वाचवायचे असेल तर, विचारवंताना तरी याचा गांभिर्याने विचार करायला हवा.

●●●

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर

**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१

**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१